# संत तुकारामांच्या जीवनावर आधारित पाच नाटकांचा विवेचनात्मक अभ्यास

# (Sant Tukaramancha Jivnavar Aadarith Pach Natkancha Vivechanatmak Abhyas)

**एम.ए. मराठी पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**


**मराठी अध्ययनशाखा**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**

अभ्यासक

## आश्विनी आनंद गांवकर

हजेरी क्र. 22P019005

ABC ID 321647345606

पी. आर. एन. 201708313

मार्गदर्शक

**डॉ. विनय मडगांवकर**

(सहायक प्राध्यापक)

मराठी अध्ययनशाखा

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा


गोवा विद्यापीठ

शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४

# SANT TUKARAMANCHA JIVNAVAR AADARIT PACH NATKANCHA VIVECHNATMAK ABHYAS

**Submitted in partial fulfilment of Masters Degree**

**MA in Marathi**

## MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION

**MA Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**

by


**Ashwini Anand Gaonkar**

Seat No: 22P0190005

ABC ID: 321647345606

PRN: 201708313


Under the supervision of


**Dr. Vinay Madgaonkar**

(Assistant Professor)

**MA Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature


**Goa University**

**2023 – 2024**

## DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report entitled, 'संत तुकारामांच्या जीवनावर आधारित पाच नाटकांचा विवेचनात्मक अभ्यास' is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of Dr. Vinay Madgaonkar and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

Date: 1 6/ 04 /2024

Place: Goa University

Ashwini Anand Gaonkar

Seat no: 22P0190005

## COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report **'संत तुकारामांच्या जीवनावर आधारित पाच नाटकांचा विवेचनात्मक अभ्यास'** is a bonafide work carried out by Ms Ashwini Anand Gaonkar under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of **Master of Arts** in the Discipline Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University.

Date: 16 /04/2024

Dr. Vinay Madgaonkar

GOA UNIVERSITY SHENOI GOEMBAB SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE TALEIGAON PLATEAU

Signature of Dean of the School

School Stamp

Date: 16/04/2024

Place: Goa University

# मनोगत

विद्यापीठात येण्यापूर्वी संत साहित्याचा विषय मी बी. ए ला असताना अभ्यासला होता. केला. संत साहित्याचा अभ्यास माझ्या आवडीचा होता. विद्यापीठात आल्यानंतर पहिल्या वर्षात डॉ. विनय मडगांवकर सर आम्हाला 'मध्ययुगीन मराठी लेखकांचा अभ्यास' हा विषय शिकवत होते. या विषयाच्या अंतर्गत आम्ही 'कृष्णदास शामा' लिखित 'श्रीकृष्ण चरित्र कथा' व 'नामदेव गाथा' हा अभ्यास केला. मध्ययुगीन मराठी लेखकांचे विषय अभ्यासताना सर आम्हाला वेगवेगळ्या संतांची माहिती, संतांचे कर्तृत्व त्याचप्रमाणे संतांनी लिहिलेले अभंग आम्हाला आजच्या काळात कसे महत्त्वाचे आहे हे पटवून देत होते. त्याचबरोबर आमच्याकडून वेगवेगळ्या संताविषयी सादरीकरण गटचर्चा करून घेत होते, या दरम्यात मला संत साहित्य हा विषय अधिक आवडू लागला.

चौथ्या सत्रासाठी आम्हाला डिजरटेशन अनिवार्य केले आहे. मी तेव्हाच ठरवलं होतं की मी प्रबंधिकेसाठी एका संताचा अभ्यास करणार.

दुसऱ्या वर्षाच्या सुरुवातीपासून माझे मार्गदर्शक डॉ. विनय मडगांवकर यांच्याशी चर्चा करून 'संत तुकारामांच्या जीवनावर आधारित पाच नाटकांचा विवेचनात्मक अभ्यास' असा मी प्रबंधिकेसाठी विषय निवडला.

प्रबंधिकेसाठी मला गोवा विद्यापीठातील मराठी विभागातील प्राध्यापकानी मदत केली खास करून माझे मार्गदर्शक डॉ. विनय मडगांवकर सर, त्याचप्रमाणे माझ्या वर्गातील मित्र मैत्रिणी गीता, आशिष,आदर्श, मंजिता यांचेही मी ऋणी आहे. त्याचप्रमाणे माझ्या कुटुंबाची मी ऋणी आहे. मी अभ्यास करत असलेल्या नाटकाचा 'तुका झालासे कळस' लेखक नरेंद्र मधुकर नाईक सरांनी मला बऱ्याच प्रमाणे नाटकांची तशीच संत तुकारामांबद्दल माहिती देऊन मदत केली.

**संत तुकारामांच्या जीवनावर आधारित पाच नाटकांचा विवेचनात्मक अभ्यास**

**<u>अनुक्रमणिका</u>**


| अनु. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | Declaration | I |
| २. | Completion Certificate | II |
| ३. | मनोगत | III |
| | **प्रस्तावना** | **१-३** |
| **१.** | **नाटक या साहित्य प्रकाराचे स्वरूप व वैशिष्ट्ये** | **४-९** |
| **२.** | **संत तुकारामांच्या जीवनावर आधारित निवडक नाट्य साहिंताचा अभ्यास** | **१०-४४** |
| **३.** | **निवडलेल्या नाटकातील पात्रांचा अभ्यास** | **४५-५५** |
| **४.** | **निवडलेल्या नाटकांचा भाषिक अभ्यास** | **५६-६२** |
| **५.** | **संत तुकारामांवर आधारित पाच  नाटकांचे तुलनात्मक अध्ययन** | **६३-७३** |
| **६.** | **समारोप** | |
| | **निष्कर्ष** | **७४** |
| ७. | परिशिष्ट | |
| ८. | संदर्भ सूची | |

**प्रास्ताविक:**

या प्रबंधिका लेखनाचा विषय संत 'तुकारामांच्या जीवनावर आधारित पाच नाटकांचा विवेचनात्मक अभ्यास' असा असून पाचही नाटकांचे वेगवेगळे लेखक आहेत. प्रस्तुत प्रबंधिकेत 'तुका म्हणे आता' पु. ल. देशपांडे', 'तारिले अभंग इंद्रयानीने 'मुरारी उत्तम जिवाजी', 'तुका आकाशा एवढा – प्रसाद तुकाराम सावंत', 'तुका झालेसे कळस श्री नरेंद्र मधुकर नाईक', 'तुका अभंग अभंग – विष्णू सूर्या वाघ' या पाचही नाटकात लेखकांनी संत तुकारामांचे दर्शवलेले भिन्न रूप, त्याचप्रमाणे साम्यता कशाप्रकारे मांडलेली आहे, या मागची करणे काय आणि नक्की संत तुकाराम कसे होते? याचा शोध घेणे, हा प्रस्तुत प्रबंधिकेचा हेतू होय.

वारकरी संप्रदायाचे हे महान संत तुकाराम जे आज संपूर्ण भारतातच नाही तर इतर देशात सुद्धा प्रसिद्ध आहे. त्यांना लोक वेगवेगळ्या तन्हेने का बघतात याचा शोध घेणे खूप महत्त्वाचा ठरतो आणि याच हेतूने मी माझा अभ्यास पुढे नेत आहे.

**संशोधन विषयक समस्या:**

वारकरी संप्रदायांचे महान संत तुकारामांचा स्वभावधर्म कसा होता, या गोष्टींचा शोध घेणे आवश्यक आहे.

संत तुकारामांच्या चरित्रावर भिन्न प्रकाराने नाटक का लिहिली गेली, या गोष्टींचा शोध घेणे आवश्यक आहे.

संशोधनकार्याची उपयुक्त / आवश्यकता

संत तुकारामाचे चरित्रावर वेगवेगळ्या तन्हेने लिहिले गेले आहे, या मागचा शोध घेणे आवश्यक आहे.

पाच वेगळे लेखक संत तुकारामाच्या चरित्रावर लिहितात त्यात साम्य आणि भेद काय आहेत याचा उलगडा होणार.

लेखक नाटकाद्वारे काय संदेश देण्याचा प्रयत्न करीत आहेत. संत तुकारामांचे अभंग आजही समाजाला मार्गदर्शक ठरत आहेत.

**संशोधनकार्यामागची उद्दिष्ट्यें:**

१) संत तुकारामांची व्यक्तिरेखा नाटकामध्ये कशा पद्धतीने मांडली आहे,

याचा शोध घेतला जाणार आहे.

२) वारकरी संप्रदायाचा काळ आणि आजचा काळ याबद्दल लेखक काय सांगण्याचा प्रयत्न करत आहे, ते समजून घेणे.

३) आजच्या पिढीसाठी संत तुकारामाचे अभंग कसे मार्गदर्शक ठरत आहेत याचे विवेचन करणे आवश्यक आहे.

४) संत तुकारामाने कशाप्रकारे सामान्य लोकांना भक्ती मार्ग दाखवला याचा  अभ्यास करणे आवश्यक आहे.

**गृहीतकांची मांडणी formulation of hypothesis 1**

१) गोमंतकीय आणि महाराष्ट्र अशा दोन वेगळ्या प्रदेशातल्या पाच वेगळ्या लेखकांनी संत तुकारामाच्या चरित्रावर भिन्न प्रकाराने नाटक लिहिले आहे.

२) पाचही नाटकात संत तुकाराम रचित अभंग आहे.

३) पाचही नाटकात संत तुकाराम हे व्यक्तीप्रमाणे दर्शविलेला आहे.

**संशोधन पद्धती**

**तौलनिक संशोधन पद्धती :-**

**प्रस्तुत प्रबंधिकेचा विषय तौलनिक संशोधन पद्धतीने जाणार.**

**creative litrature' या दृष्टीने तुलनात्मक अभ्यास होणार (लेखक आणि साहित्यकृती या दृष्टीकोणातुन)**

**प्रकरण एक**

**नाटक या साहित्य प्रकाराचे स्वरूप व वैशिष्ट्ये**

**प्रकरणाची मांडणी**

**प्रकरण दोन**

**संत तुकारामांच्या जीवनावर आधारीत निवडक नाट्यसाहिंताचा अभ्यास**

**प्रकरण तीन**

**निवडलेल्या नाटकातील पात्रांचा अभ्यास**

**प्रकरण चार**

**निवडलेल्या नाटकांचा भाषिक अभ्यास**

**प्रकरण पाच**

**संत तुकारामांवर आधारित पाच  नाटकांचे तुलनात्मक अध्यायन**

**समारोप**

**प्रबंधासाठी पाच वेगळ्या नाटककारांची नाटकांचा अभ्यास होणार आहे यावरून बरेच प्रश्नांची उत्तरे मिळणार अशी अपेक्षा बाळगून मी माझा अभ्यास पुढ**

# प्रकरण १

# 'नाटक' या साहित्य प्रकारचे स्वरूप व वैशिष्ट्ये

## १.१ प्रस्तावना

नाटक हा साहित्यप्रकार इतर साहित्य प्रकारापेक्षा वेगळा साहित्यप्रकार आहे. नाटकाचा उल्लेख करत असताना लोकप्रिय साहित्य प्रकार म्हणून उल्लेख करता येईल कथा, कादंबरी, कविता, चरित्रात्मक, चरित्र, प्रवासवर्णन या साहित्य प्रकारापेक्षा नाटक हा साहित्यप्रकार कसा वेगळा ठरतो याचा शोध अनेक लेखकांनी व साहित्यिकारांनी घेतला आहे.

जुन्या काळापासून नाटक हे काम करून दमलेल्या , कंठाळलेल्या माणसासाठी आनंद निर्माण करण्यासाठी नाटक हा प्रकार उदयास आला. नाटक हे मनोरंजनाचेसाधन असते.

## १.२ नाटक

नाटक हा एक सादरीकरण्याचा प्रकार आहे म्हणूनच नाटक हा इतर साहित्य प्रकारापेक्षा वेगळा साहित्य प्रकार आहे. कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन या साहित्याला सोडून बालसाहित्याच्या कथांचे आज नाट्य रूपात सादरीकरण होताना दिसते. जास्त प्रमाणात हे होत नसते पण आताच कुठेतरी बालसाहित्याची सादरीकरण करण्याची सुरुवात झालेली आहे. पण नाटक मुळात हे सादर करण्यासाठीच असते आणि यासाठी नाटक हा वेगळा साहित्यप्रकार ठरतो.

इतर साहित्य प्रकारापेक्षा नाटक हा साहित्यप्रकार श्रेष्ठ आहे कारण नाटक लिहिताना लेखकाला हे लक्षात घ्यावे लागते की नाटकाचा प्रयोग होणार. वेशभूषा, रंगभूषा याची काळजी नाटक लिहिताना घ्यावी लागते. तेच अन्य साहित्यप्रकार लिहिताना या अनेक गोष्टींची काळजी घ्यावी लागत नाही. इतर साहित्यप्रकार वाचावे लागतात पण नाटक हे मुळात बघण्यासाठी आणि यासाठी नाटक हा साहित्यप्रकार लोकप्रिय आहे.

नाटकात सर्वात महत्त्वाचा घटक कथानक आहे. नाटकात सगळ्यात महत्त्वाचा म्हणजे आरंभ असतो कारण आरंभ हा वातावरण निर्माण करणारा असतो . नाटकात अंक महत्त्वाचे असतात. प्रत्येक अंकात प्रवेश

असतात ते किती प्रवेश यावे ते नाटकरावर अवलंबून असतात जे चांगल्या नाट्य प्रयोगासाठी म्हत्वाचे ठरतात.

नाटक हे दृकश्राव्य असते. त्याचबरोबर नृत्य आणि संगीताचाही वापर नाटकात होत असतो. जे प्रेक्षकांमध्ये मनात आवड निर्माण असते.

**१.३ मराठी नाटकाचे परंपरा**

मराठी नाटकाचा विचार करताना विष्णुदास भावे यांचे सीता स्वयंवर १९४३ मध्ये सर्वात पहिले मराठी नाटक मानले जाते. आपल्या 'सीता स्वयंवराख्यान' या नाटकाद्वारे आधुनिक मराठी रंगभूमीची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर वि. ज. परशुरामपंत गोडबोले यांनी काही नाटके लिहिली.

१८८० साली नाट्यवाङ्मयाच्या क्षेत्रात एक महान क्रांती घडून आली. इ. स. १८८० मध्ये अण्णासाहेब किर्लोस्करांनी 'संगीत शाकुंतल' हे पहिले संगीत नाटक लिहिले. १८८३ मध्ये त्यांनी 'संगीत सौभद्र' लिहिले. या नाटकाने नाट्यक्षेत्रात अभूतपूर्व क्रांती घडवून आणली. तेव्हापासून सुरू झालेल्या नाटकाचा हा प्रवाह आजतागायत सुरूच आहे. यात गोविंद बल्लाळ देवल, कोल्हटकर, खाडीलकर, राम गणेश गडकरी, आचार्य अत्रे, विद्याधर गोखले, वि. वा. शिरवाडकर, पु. ल. देशपांडे, वसंत कानेटकर, रत्नाकर मानकरी, विजय तेंडुलकर इतर अनेक नाटककारांनी अनेक नवी नाटके लिहून मराठी नाटकांची परंपरा समृद्ध केली.

गोमंतक हा नाट्यवेडा म्हणून ओळखला जातो. गोमंतकात नाटकरांची परंपरा फार जुनी आहे. इथं गावोगावी होणाऱ्या जत्रा, काले आणि इतर उत्सवामध्ये कित्येक नाटकांचे प्रयोग होतात. यात पौराणिक, ऐतिहासिक आणि सामाजिक विषयावरील नाटकांचा समावेश असतो.

मराठी नाट्यकलेत 'नाट्य मन्वंतर' आणि 'लिटल थियेटर' ने नवा जोग निर्माण केला. नंतर मराठी रंगभूमीला पुन्हा वैभव संपन्न करण्यास प्र. के. अत्रे, पु. ल. देशपांडे, जयवंत दळवी, विजय तेंडुलकर, चि. त्र्य. खानोलकर, महेश एलकुंचवार, प्रदीप दळवी इ. प्रयत्न केला. "१६७६ ते १८५५ या काळात म्हणजे जवळ जवळ १८० वर्षे भोसले घराण्याने तजांबरात राज्य केले."[i]

## १.४ नाटक: संकल्पना व स्वरूप

नाटक हा एक वाड्मय प्रकार आहे. नाटक हे अनेक कलाप्रकारांच्या मिश्रणातून आलेले आहे. ब्रह्मदेवाने ऋग्वेदापासून रस घेऊन'नाट्यवेद निर्माण केला. आज सुध्दा नाट्यप्रयोग करण्यासाठी तिसऱ्या शतकात आलेल्या भरतमुनींचा 'नाट्यशास्त्र' हा ग्रंथ वापरला जातो, ज्यला 'पंचमवेद' असेही म्हणतात. मराठी नाट्यवाङ्मयात 'विदूषक' ही व्यक्तिरेखा महत्त्वाची आहे.

नृ-नृत्य-नाटक या प्रकारे नाटकाची व्यूत्पत्ती केली आहे. नाटक हा जीवनाचा आरसा आहे. नाटकात सोंग आणले जाते म्हणजेच अभिनय करणे. नाटकात सामाजिक समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला जातो. प्राचीन काळात भारतीय नाट्यप्रयोगाचे स्वरूप 'ग्रीक व रोमन' नाट्यप्रयोगापेक्षा वेगळे होते. नाटकाचा प्रयोग रंगभूमीवर सादर करतात म्हणून नाटकाला 'प्रयोगश्रम कला' ही म्हणतात.

## १.५ व्याख्या

"The literary quality is something that may be added to a drama, but which is not essential to its value as a play in the theatre itself. And while we cannot have a great play unless it is lifted in to literature by skill of structure, veracity of character, by felicity of dialogue. "

-Brander Mathews( ब्रन्डर मॅथ्यूस)

## १.६ नाटकाचे घटक

नाटक हा कला प्रकार असल्या कारणाने नाटकात नाट्यसंहिता संवाद, दिग्दर्शक, वेशभूषा, रंगभूषा, इत्यादी विषय येतात. नाटक सादरीकरण करण्याच्या दृष्टीने नाटकाचे प्रकार खूपच महत्त्वाचे ठरते. नाटक लिखित स्वरूपात म्हणजे नाट्यसंहिता त्यात कथानक, व्यक्तिरेखा, संवाद, अंक प्रवेश इत्यादी येतात. नाटक कसे करावे किंवा नाटकात दृश्य दाखवताना काय काय अपेक्षित आहे हे सुद्धा त्यात लिहिले गेले असता.

कथा लिहिण्यासाठी कथा बिजाची गरज असते त्याचप्रमाणे नाटक लिहिण्यासाठी सुद्धा एक नाटककार नाटक लिहीत असतो. नाटक हे नाटकाच्या कथानकावर अवलंबून असतात. आपण ज्या वर्गासाठी लिहितो उदाहरणार्थ लहान मुले, प्रौढ याला अनुसरून नाटकाचा कथानक असतो.

**१.६.१ शीर्षक**:

शीर्षक हा नाटकाचा अगदी महत्त्वाचा आणि प्रमुख घटक आहे. काही नाटकांच्या शीर्षकावरून नाटकाच्या विषयाची कल्पना येते.

उदाहरणार्थ 'ती फुलराणी', 'प्रेमा तुझा रंग कसा'

**१.६.२ कथानक:**

कथानकात माणसाच्या जिव्हाळयाचे विषय मांडले जाते. नाटकाचे कथानक हे वैशिष्ट्यपूर्ण असते.

**१.६.३ पात्र**:

नाटकातला तोल सांभाळता येईल या पद्धतीने नाटकातील व्यक्तीचित्रण केले पाहिजे. नाटकात मुख्य असतात ते अभिनय करणारे.[ii]

**१.६.४ संवाद**:

नाटकात जसे पात्र महत्त्वाचे असतात त्याचप्रमाणे पात्राला दिलेले संवाद सुद्धा महत्त्वाचे असतात. संपूर्ण नाटक हे संवादावर अवलंबून असतात. नाटकात साधेचे संवाद असावे.

**१.६.५ नेपथ्य**:

नेपथ्य हा नाटकाचा आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. नाटक 'दृकश्राव्य' माध्यम असल्याने दाखवण्याच्या गोष्टीत निपत्याला अत्यंत महत्त्व असते. एकंदर रंगमंचावरील देखावा म्हणजेच नेपथ्य.

**१.६.६ प्रकाश योजना**:

नाटकात प्रकाश योजना हा सुद्धा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे कारण प्रकाशामुळेच सुख, दुःख, विरह-मिलन यासारख्या गोष्टी दाखवण्यात प्रकाश योजना खूप मदत करतात.

**१.६.७ संगीत योजना**:

मराठी रंगभूमीतील सुरुवातीचे नाटक संगीत नाटक होते आणि यासाठी रसिकांचा नाट्य संगीत हे प्राण आहे. नाटकात संगीत महत्त्वाचे ठरतात.

**१.७ नाटकाचे प्रकार**

नाटकाचे प्रकार वेगवेगळे आहे. त्यात पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, विनोदी अशा विविध नाटकांचा समावेश होतो.

**१.७.१ पौराणिक नाटक**

नाटकाची सुरुवातच मुळात पौराणिक नाटकांने झाली आहे. आणि पौराणिक नाटकात महत्त्वाचे पात्र ते नारद ठरतात.

उदाहरणार्थ रुक्मिणी स्वयंवर, अर्जुन सुभद्रा विवाह शकुंतला- दृश्यत विवाह.

**१.७.२ ऐतिहासिक नाटक**

दंतकथेच्या आधारे ऐतिहासिक नाट्यकृती वाटचाल करते. वि. ज. कीर्तने यांच्या द्वारे लिखित 'थोरले माधवराव पेशवे' या प्रकारच्या लेखनाचा पाया घातला.

**१.७.३ सामाजिक नाटक**

सामाजिक नाटकात सामाजिक विषय येतात उदाहरणार्थ विवाह, सुख दुःख. सामाजिक नाटकात दोन प्रवाह दिसतात आणि ते म्हणजे सुखात्मक आणि दुखात्मक

**१.७.४ राजकीय नाटक**

राजकीय नाटकात सत्तांतर राजकारण सत्ता संघर्ष असे विषय मांडले जातात. उदाहरणार्थ ‘आमदार सौभाग्यवती’, ‘उध्वस्त धर्मशाळा’ अशी राजकीय नाटके आहेत.

**१.७.५ विनोदी नाटक**:

हजरजबाबीपणा आणि खटकेबाज संवाद हे विनोदी नाटकाचे विशेष आहे. आचार्य अत्रे, आणि पु.ल.देशपांडे इ. विनोदी नाटककार म्हणून ओळखले जातात.

**१.७.६ दलित नाटक**:

दलित जाणीवा व्यक्त करणारे नाटक म्हणजे दलित नाटक. वाटा-पळवाटा, आवर्त, किरवंत, बेरीज वजाबाकी हे नाटके दलित नाटके म्हणून प्रसिद्ध आहे.

**१.७.७ संगीत नाटक**:

संगीत नाटक हा कलाप्रकाराच्या आणि नाटक ह्या साहित्य प्रकारातून निर्माण झाला आहे. उदाहरणातर्थ: 'संगीत शाकुंतल', 'संगीत शारदा'

**१.८ निष्कर्ष:**

शब्दापासून तयार होणारी संहितेचे सादरीकरण करणे म्हणजे नाटक. नाटक सादर करताना नेपथ्य, संगीत, प्रकाश योजना, अभिनय यासारख्या गोष्टींची गरज लागते. मुळात नाटक हे सादरीकरणासाठी लिहिले जाते.

इतर साहित्य प्रकारात साहित्य आणि वाचक असे दोन घटक असतात पण नाटकात नाटक करणारे अभिनेते वरसी हे महत्त्वाचे ठरतात. नाटकाला संहिता असते पण नाटक रंगमंचावर आल्याशिवाय पूर्ण होत नाही.

**१.९ समारोप:**

आपण लहानपणापासून नाटक हा शब्द ऐकला आहे. नाटक हे मनोरंजनाचे साधन आहे, असे असून असून नाटकाला सुमारे दोन हजार वर्षांची दीर्घ परंपरा लाभली आहे.

**संदर्भ सूची**

---

[i] १६७६ ते १८५५ या काळात म्हणजे जवळ जवळ १८० वर्षे भोसले घराण्याने तजांबरात राज्य केले.

[ii] नेरलेकर प्रिया, 'नाटक' या साहित्यप्रकाराचे सैद्धांतिक परिचय

## प्रकरण २

## संत तुकारामांच्या जीवनावर आधारित निवडक नाट्यसहितांचा अभ्यास

### २.१ प्रस्तावना:

प्राचीन काळापासून आपल्याकडे संत साहित्याची परंपरा अखंडपणे चालत आलेले आहे. इ. स.पूर्व कालखंडात भारतामध्ये विविध प्रांपत प्रदेशातून साधु संत निर्माण झाले. या साधुसंतांनी सत्याने देवाची निसिम भक्ती केली त्याचबरोबर जनक कल्याणाकरिता ते पूर्ण श्रध्देने राहिले इ.स. च्या बाराव्या शतकात महाराष्ट्रामध्ये संत श्रेष्ठ संत माऊली संत  ज्ञानेश्वरांचा जन्म झाला. संत ज्ञानदेवापासूनच संत साहित्याची परंपरा सुरू झाल्याचे आपण मानतो.' ज्ञानदेवी रचिला पाया' या वाक्यावरून महाराष्ट्रामध्ये अगदी तेजाने उदयास आलेली आणि श्रेष्ठ कनिष्ठांना आपल्या सामावून घेणारा संप्रदाय म्हणजे 'भागवत संप्रदाय' या संप्रदायाची मुख्य देवता ही 'विठ्ठल' आहे. वारकरी संत मंडळींमध्ये संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपान देव, मुक्ताबाई, नामदेव, गोरा कुंभार, संत एकनाथ, संत निळोबा, नरहरी सोनार, सेना न्हावी, सावतामाळी, सोयरा बाई,  चोखामेळा, त्याच  प्रमाणे संत तुकाराम महाराज हे महान संत होऊन गेले. माझ्या प्रबंधिकेसाठी मी संत तुकाराम  महाराजांच्या जीवनावर आधारित पाच नाटकांचा विवेचनात्मक अभ्यास असा विषय निवडलेला असून मी हे आनंददायी  काम हातात घेताना संत तुकारामाचे चरित्रावर लिहिलेल्या पाच नाटकांची निवड केलेली आहे. प्रस्तुत प्रबंधिके  प्रसाद तुकाराम सावंत लिखित तुका आकाशा एवढा(१९ ऑगस्ट २००१),  पु. ल. देशपांडे लिखित तुका म्हणे आता (मे १९७९), विष्णू सूर्या वाघ  लिखित तुका अभंग अभंग (सप्टेंबर २००० ),श्री नरेंद्र मधुकर नाईक लिखित तुका झालेसे कळस (सप्टेंबर२००९), मुरारी उत्तम जिवाजी लिखित तारिले अभंग इंद्रयानीने (२६ जानेवारी २०१३)या पाचही नाटकात लेखकांनी संत तुकारामाचे दर्शविलेले भिन्न रूप त्याचप्रमाणे साम्यता कशाप्रकारे मांडलेली आहे  याचा अभ्यास करणार आहे.

वारकरी संप्रदायाचे हे महान संत तुकाराम जे आज संपूर्ण भारतातच नाही तर इतर देशात सुद्धा प्रसिद्ध आहे यांचा नक्की लोक वेगवेगळ्या तऱ्हेने का बघतात याचा शोध घेणे खूप महत्त्वाचा ठरतो.

असे असताना सुद्धा अनेक लोकांना संत तुकाराम हे वेगळे वाटतात त्या मागचे कारण काय आहे याचा शोध घेणे खूप महत्त्वाचा ठरतो हा शोध तेव्हाच पूर्ण होऊ शकतो जेव्हा प्रत्येकाचा विचार आपण लक्षात घेऊन अभ्यास करणार आणि हे शोधण्याची आवश्यकता भासते.

**२.२ संत तुकाराम महाराजांचे जीवन चरित्र:**

तुकाराम समजण्यासाठी आपणांस फार दूर जावयास नको. त्यांचे अभंग हा त्यांचा मनाचा आरसा आहे.[ii] संत तुकाराम महाराजांचा जन्म देहू येथे इंद्रायणीच्या तीरावर इ. स. १६०८ मध्ये सतराव्या शतकात झाला होता. जनसामान्यांना तुकोबा परिचित आहे संत म्हणून त्याचप्रमाणे विठ्ठलाचा भक्त म्हणूनही तुकोबा प्रसिद्ध आहे. तुकोबा सामान्य महाकवी  तसेच एक साक्षात्कारी संत पुरूष होते. ते शूद्र वंशातील होते. ‘‘यातीशूद्र वंश केला’’[iii] हे स्वतः तुकोबांनी माहिती दिली आहे.

त्यांचे कुलदेवत विठ्ठल व परंपरा वारकऱ्यांची होती. तुकारामांच्या आईचे नाव कनकाई व वडिलांचे नाव बोल्होबा असे होते. तुकोबांचे घराणे प्रतिष्ठित होते, देहू गावाची महाजन की त्याच्यां घराण्याकडे होती. तुकोबांच्य थोरल्या भावाचे नाव सावजी व धाकट्या भावाचे नाव कान्होबा होते. तुकारामांच्या लहानपणीच त्यांचा आई-वडीलांचा मृत्यू झाल्याकारणाने संसाराची जबाबदारी संत तुकाराम महाराजांवर आली. दुष्काळामुळे त्यांच्या जवळचे त्याचप्रमाणे त्यांची एक पत्नी अन्नाविना गेली.दुष्काळात लोकांना कर्ज देत देत संत तुकाराम स्वतः कर्जबाजारी झाले. दुष्काळानंतर त्याने लोकांचे कर्ज माफ केले कारण त्यांना लक्षात आले या जगात जे काही आहे ते मोहमाया, खरे सुख तर देवाची भक्ती करण्यात आली. तुकारामांने देहुतले छोटेसे मंदिर दुरुस्त केले व संसाराकडे दुर्लक्ष करून विठ्ठलाची भक्ती करू लागले. बाबाजी चैतन्यांनी स्वप्नात येऊन उपदेश केल्यानंतर तुकारामांना कुठल्याही सुखाचे दुःखाचे फरक पडत नव्हते. त्यांनी अभंग रचना करायला सुरुवात केली. लोकांनी अपेक्ष घेतल्यामुळे त्यांनी लिहिलेल्या अभंगाचा वह्या इंद्रायणीत बुडविल्या ईश्वर कृपेने वह्या परत मिळाल्या देवाच्या प्राप्तीसाठी त्याने निर्जन अशा भामनाथ डोंगरावर जाऊन तप करायला सुरुवात केली देहू, लोहगाव, पंढरपूर येथे त्यांच्या कीर्तनासाठी गर्दी होऊ लागली तर काही लोक त्यांच्या विरोधात बोलू लागली. संत तुकाराम महाराज अभंगातून अध्यात्म सांगत होते म्हणून रामेश्वर भटाने ते अधिकाराविरुद्ध होते म्हणून त्यांची तक्रार केली कनिष्ठ जातीमुळे त्यांना सर्व अपमान सहन करावा लागला. मंबाजीने संत तुकाराम महाराजांना खूप त्रास दिला

पण कितीही त्रास अपमान झाला तरी संत तुकाराम महाराजांनी विठ्ठल भक्ती सोडली नाही. 'तुकारामाने वेद पुराणे यांना 'माता' म्हणून संबोधले आहे.'[ii]

संत तुकाराम महाराजांनी अभंग रचना केल्याने त्यांना अपराधीपणाची भावना निर्माण झालेली खालील दिसून येते.

" मी अभंग रचना करतो, पण खरे सांगू का, देवाने जसे वदवले तसे मी वदतो. हे संतानो, तुम्हाला तर माझी जात माहीतच आहे. याबाबतीत अधिकार नसतानाही मी काव्य निर्मिती करतो. माझा अपराध मनावर न घेता कुठलाही राग न धरता तुम्ही मला क्षमा करा. तुम्ही दिनाचे मायबाप आहात. तुमच्या चरणावर मला जागा द्यावी. माझ्याकडून हे बोल व दविणारा ईश्वर आहे. त्यानेच मला उचित धर्म व अध्यात्माचे मर्म सांगितले आहे. "[ii]

संत तुकाराम हे इतर संतापेक्षा वेगळे आहेत हे आम्हाला संत तुकारामांच्या अभंगावरून कळून येते संत तुकाराम महाराज हे एक साक्षात्कारी संतकवी होते. संत तुकारामांनी केवळ विठ्ठलाच्या भक्तीत अभंग लिहिण्या पुरती मर्यादित न राहता तर त्याच्या पलीकडे जाऊन क्रांतिदर्शी असे संत होते. संत तुकारामांच्या अभंगांवर अनेक जणांनी अभ्यास केलेला आहे आणि त्याचा अर्थ समजण्याचा प्रयत्न केलेला आहे. संत तुकारामांचे अभंग इंद्रायणी नदीत फेकून दिले होते पण असे म्हणतात की लाखो लोकांच्या तोंडावर संत तुकारामांचे अभंग असल्याने ते अभंग आज सुद्धा जीवीत आहे आज आपल्याला तेच अभंग पुस्तक स्वरूपात बघायला वाचायला, अभ्यासायला मिळतात.

**२.३ कथानक:**

**२.३.१ तुका अभंग अभंग या नाटकाचा कथानक:**

प्रस्तुत नाटक दोन अंकी आहे. तुकारामांचे वडील बोल्होबा गावचे सावकार होते. त्यांच्या घराला प्रतिष्ठा होतीच त्याचप्रमाणे कुळाचा महाजनचां अधिकारही त्यांना होता. बोल्होभा चांगल्या प्रकारे सगळेच सांभाळत होते दुष्काळात तुकारामाचं दुकान कर्जात गेलं आणि त्यांनी लोकांना वाटलेले कर्ज सुद्धा वसूल केले नव्हते आणि स्वतः कर्जबाजारी झाला. त्याना व्यापारी म्हणून सुद्धा गावात कोणी किंमत देत नाही. बरीच माणसे एकमेकांशी संवाद साधत, देऊ गावातील नदीकाठीची न्याय साठी बसलेले आहे. वीस पंचवीस वर्षाचा तुकाराम डाव्या कोपऱ्यात मान खाली घालून उभा आहे गावचा पाटील या नात्याने मोरे-अंबिले तुकारामाकडून सर्व

अधिकार काढून घेतो. गावात त्याला कोणीही कर्ज देणार नाही  हे ऐकताच  तुकारामावर आघात झाल्यासारखा होतो. जमलेले लोक त्याची मस्करी करून जातात.

सात दिवस तुकारामाची बायको जिजाई आणि संताजी शोधत होते. तुकाराम डोंगरावर जाऊन एका शिळेवर डोळे मिटन विठ्ठलाला शोधण्याचा प्रयत्न करतो  त्याच्यामते आपल्या संसाराची ही वाट लागली आहे ती देवानेच लावलेले आहे. जिजाई तुकारामाला बघून जे त्याच्या मनात होते ते बोलू लागते इतक्यात संताजी जिजाईला सावरून घेतो दोघे मिळून तुकारामाला जागे करतात. तुकारामांच्या लक्षात येते की या जगात फक्त तोच एकटाच दुःखी नाही प्रत्येक माणूस जगात दुखी आहेतच आणि त्याला आता लोकांनी घेतलेले कर्ज परत घ्यायचे नाही आहे.

संताजीने तेल काढण्याचा धंदा सुरू केला, ते सगळ्यात अगोदर तुकारामाला तेल देतो. तुकाराम त्याला सांगतो की हे तेल पहिल्यांदा देवाला ठेव पण संताजी त्याला सांगतो की माझा देव तर तूच आहे संताजीला ही जाणीव आहे की दुष्काळात त्याची बायको आणि पोरं मरायला पावली होती पण त्यावेळी तुकारामानेच त्यांना धान्य देऊन त्यांचा जीव वाचवला होता आणि त्यांना त्यांची मुलं पोटभर जेवण जेवली होती एवढेच नाही तर जगात जेव्हा दुष्काळ पडला होता तेव्हा लोकांकडे खाण्यासाठी धान्य नव्हते त्यावेळी तुकाराम लोकांची पोट भरण्यासाठी स्वतःच्या आणि स्वतःच्या कुटुंबाची परवा न करता सगळ्यांना धान्य देऊन त्यांनी सोडले होते. संताजी तुकारामला उपदेश करतो की तुम्ही हा गाव सोडून दुसरीकडे चला कारण तुमच्यातला देव देहुतल्या लोकांना दिसणार नाही तेव्हा तुकाराम संताजीना समजावतो की ही सगळी लोक आमचीच आहे आणि ही भूमी संतांची आहे या भूमी ज्ञानदेव झाला, याच भूमीत नामदेव झाला, जनाबाई आणि हे महान संतच खरे पूर्वज असे तुकाराम मानतो त्यांची भूमी सोडून तुकारामाला कुठेच जायचं नाही.

गावात श्राद्ध होतं गावातील भटजी एका एका घरी जाऊन श्राद्ध करीत होता सकाळपासून तुकाराम भटजींची वाट पाहत होता भटजींना येण्यासाठी खूप वेळ झाला उशीर झाला होता म्हणून जेव्हा भटजी येतो तेव्हा तुकाराम भडजीवर राग करतो आणि त्यांना उलटून सुलटून उत्तर देत राहतो.  भटजी बुवा नीट मंत्र म्हणत नाही म्हणून भटजींच्या गळयातल्या जानव्याचा  झडप घालून भटजीचं जानव मुठीत पकडतो व त्याचा फास्ट करून दावं बांधलेलं गुराप्रमाणे त्याला फरफट पाटाकडे घेऊन जाऊन मंत्र सारखे म्हणायला सांगतो, एवढ्याचीच आहे तिथे येऊन भटजीला काढून घेते आणि त्याला सांगते की तुम्ही घरी चला दोघेजण एकमेकाला वाईट वाईट उत्तर

देतात. भटजी केल्यानंतर जिजाई तुकारामांना समजण्याची प्रयत्न करते पण तुकाराम जिजाईना समज समजावतो की आपण गप्प राहिलो तर हे असे आमच्यावर हत्याचार करीत राहील आपण गप्प राहायचे नाही.

नामदेव नाचत त्याच्या स्वप्नात येतो त्याचबरोबर विठ्ठल नाचत येतो स्वप्नात नामदेव तुकाराम हाक मारतो आणि सांगतो की मी तुला जागा करण्यासाठी नामदेव त्याला सांगतो की तू मला हवा आहे माझा अपूर्ण काम तू पूर्ण केलं पाहिजे. या महाड भूमीत ज्ञानदेवाबरोबर मीही भक्तीचा जागर मांडला होता तुझी सेवा म्हणून एक कोटी अभंग लिहीन असा शब्द श्री विठ्ठलाला दिला होता पण ते काम पूर्ण होऊ शकलं नाही पण हे काम आता तुला पूर्ण करायचा आहे तुझा स्वतःवर विश्वास नसला तरी तू अभंग लिहायला आराम कर तुला जमेल पहिल्यांदा तुकोबांनी हे काम मान्य केलं नाही पण संत नामदेवांनी त्याला सांगितलं माझा तुझ्यावर आशीर्वाद आहे तू कामाला आरंभ कर हे काम तू करू शकतो.

तुकारामांच्या स्वप्नात नामदेव येऊन संत तुकाराम कीर्तन करू लागतो, गावातील बारीक सारीक सल्ल्यासाठी लोक भटजींकडे येत होते पण आता ते तुकारामा जवळ जाऊ लागतात. लोक त्यांच्या पायावर डोके ठेवतात यावर काहीतरी पर्याय काढावा म्हणून भटजी मंबाजी कडे गेले आहे. मंबाजीना प्रचंड राग येतो अशा अवस्थेत शिष्य मंबाजीची मस्करी करतो की संत तुकाराम आपल्या अभंगात मंबाजीना बगळा नंदीबैल गाढव असे म्हणतात त्यावेळी मंबाजी शिष्यावर रागावतो आणि त्याला तिथून जायला सांगतो एवढ्यात मंबांची एक मंत्र म्हणतो आणि आपल्या अंगात प्रभू श्रीराम आला आहे असे दाखवतो आणि तुकारामांचा शिरच्छेद करा डोकं उडवा, आणि लोकांना सांगा की तू त्याच्या नादी लागू नका विठ्ठलाच्या पाया पडून काही होणार नाही माझी भक्ती केली पाहिजे म्हणजे मंबाजीच्या रूपात मी अवतरी झालो आहे एवढ्यात सगळेजण जय प्रभू राम जय प्रभू राम करू लागतात.

लोहगावच्या सर्व सज्जनानी संत तुकारामाला बोलावलेला आहे जय जय विठोबा रखुमाई या मंत्राचा गजर करीत संत तुकाराम सोबत वारकरी हळूहळू अंधार कमी होतो आणि तुकोबा आणि लोक मंचावर दिसू लागतो.संत तुकाराम येतात तो सर्वांना साष्टांग दंडवत घालतो आणि सांगतो की मला काही येत नाही तर मी फक्त देवाची आज्ञा म्हणून अभंग म्हणतो मला काही अधिकार आणि परंपरा नाही आणि मी श्रीमंत सुद्धा नाही माझ्यात सूर सुद्धा नाही आहे. लोक त्याला सांगतात की तुकोबा असा कमीपणा घेऊ नका तुमच्यावर स्वतः विठ्ठलाची कृपा आहे.

शिवबा सर्वांना घेऊन जेवणासाठी त्याच्या घरी जातो त्याची पत्नी पार्वतीला तुकोबा आवडत नव्हते, कारण तिचा नवरा तुकोबासोबत राहून काम धंदा सर्व सोडून अभंग गायचा तुकारामाला घरी पाहताच तुकारामाना शिव्या देतात आणि तुकारामाला बसण्यासाठी फाटका तरट घेऊन येते नंतर दोरीत ओवलेल्या वाहणांचा हार तुकोबाच्या गळ्यात घालते, शिवबा तिला शिव्या देतात पण तुकाराम एका वाक्यात सुद्धा तिला काहीही म्हणत नाही. नंतर पातेल्यातलं गरम गरम उखळलेलं पाणी तुकोबांच्या अंगावर होते तुकोबा किंकाळी फोडतो आणि शिवबा पार्वतीला शिव्या देतो तुकाराम थंड लेप घेऊन यायला सांगतो. अकस्मात ओंकाराचा घोष ऐकू येतो आणि एक दिव्य तेजोमय ऋषीमुर्ती म्हणजे बाबाची तिथे येताना त्याच्यासमोर त्याला दिसते त्याचबरोबर ओंकाराचा घोष चालूच आहे . बाबाजी चैतन्य निरंजनाच्या विश्वातून आले होते ज्यांना भक्ता येत नाही कारण त्यांच्या अवतीभवती ज्वाला होती ते कधीच जळून गेले होते आता ते तुकारामांना जळायला आले होते बाबाजी विचारतो की तू एवढ्या शरीराच्या पिढीनं इतका व्याकुळ झाला असा होता कामा विठ्ठलाचे केवळ अभंग गाऊन चालत नाही नामदेवाने तुला कवित्व करण्याचा उपदेश केला आहे त्यामाहान नामदेवाच्या कीर्तनात विठ्ठल साक्षात नाचत होते पण गुरुबानी मडकी थापडली तेव्हा नामदेवाचा मडकं कच्च निघालं विठ्ठल अवतीभवती नाचत नाही नामदेव स्वतःला ओळखू शकला नाही कारण त्याला गुरुकृपा प्राप्त झाली नव्हती बाबाजी त्याचा गुरु होतो आणि नाम हे शस्त्र म्हणून सांगतो तुला असल्या छोट्या छोट्या गोष्टी त्रास करता कामा नाही काहीही झालं तर तुला दुःख आणि आनंद येता कामा नाही तुकाराम एका नव्या जाणिवेने भरलेला हळूहळू उठू लागतो आणि विठ्ठलाच्या प्रतिकृती जवळ जाऊन आभाळाच्या दिशेने दोन्ही हात फैलावतो.

**अंक दुसरा**

पहिले दृश्यात बाबाजी चैतन्याचा आशीर्वाद घेऊन संत तुकाराम विठ्ठलाच्या शोधासाठी निघाला विठ्ठलाला शोधता शोधता बाबांनाथांच्या डोंगरावर येऊन बसलेला होता तिथे त्यांनी आपले सर्व देहभान विसरलेले होते धडा झुडपात लपून संतांची त्यांचे अभंग लिहून घेत होती जिजाई थकलेली तुकारामांना शोधता शोधता नात्यावर शिदोरी घेऊन तिथे पोचली तिला वाटलं की तुकाराम कुठेतरी लपून बसला असतील अचानक तुकारामांचे अभंग तिच्या कानावर पडतात तिथे जिजा संताजी कडून तीला कळतं की तुकाराम देवाच्या शोधात आहे आणि संत तुकाराम आपल्या बायकोला सुद्धा कंठालेला आहे ती रागवून तिथून घरी जाते.

विठोबा विठ्ठलाला शोधून शोधून कंटाळतो देव मात्र त्याला कुठे दिसत नाही उपाशी पोटी तो देवाची पूजा अर्चना करतो पण देव काही दिला मिळत नाही. आजूबाजूला काही लोकांचा समुदाय आणि त्यातून एक सूर ऐकू येतात त्यात विठ्ठलाचे अभंग गायले जातात. तो देवा पुढे रडतो की नामदेव आणि मला प्रेरणादेवी दिली म्हणून मी अभंग केला, बाबाजी चैतन्यानं अनुग्रह दिला राम कृष्ण हरी मंत्र मिळाला आणि आत्म्याला तहान लागली आहे फक्त विठ्ठल विठ्ठल आणि कोणालाही तळमळ कळत नाही. तुझ्या दर्शनासाठी जे मी करू शकलो असतो ते मी केलं तरी तू मला दर्शन देत नाही तुकाराम विठ्ठला पाशी भिगमांगतो दर्शनसाठी आणि विठ्ठल त्याला दर्शन देत नाही म्हणून संत तुकाराम विठ्ठलाला शिव्या घालतात आणि नको मला तुझे दर्शन म्हणून सांगतात आणि तुकाराम रडू लागतो अशा वातावरणातून एक मुरली चे सूर ऐकू येतात तुकाराम ती मुरली वाजवण्याची बंद करायला सांगतो आणि विठ्ठल मेला एवढ्यात काळोख दाटून येतो आणि क्षणभर बासरीची लय वाढत जाते घंटा किन किनतात आणि कमरेवर हात ठेवलेला नाचत विठ्ठल तुकारामाला दिसतो तुकाराम त्याला हाक मारतो विठ्ठला.

शिवाजी सतत चार दिवस लोहगावात ला महाराजांचं कीर्तन ऐकलं होतं ते कीर्तन ऐकून शिवाजी महाराज संत तुकारामांचे मोठे भक्त होतात आणि त्यांचा शिष्य होण्यासाठी संत तुकारामांच्या भेटीस जातो पण संत तुकाराम काही त्यांना भेटत नाही त्यासाठी तुझी ज्यांच्या भेटीसाठी जातो शिवबा शिवाजींना महाराजांना जिजाईना भेटीसाठी घेऊन येतो जिजाई म्हणते की मी काय अभंग गात  तुकाराम महाराज आणि संताजी तिथे येतात शिवाजी त्यांचा शिष्य म्हणून तिथे थांबायला त्याला पाहिजे पण तुकाराम त्याला समजावून सांगतो की तू जे काम करतो ते देशासाठीच हाय तुझे काम सुद्धा तेवढेच महत्त्वाचे आहे हे त्याला महत्त्व पटवून देतो और त्याला आशीर्वाद देऊन त्याला पाठवतो.

एक मच्छर येऊन त्याला त्रास करतो शिष्य म्हणतो की हा मच्छर तुकोबांचा असणार म्हणून येऊन आम्हाला त्रास करतो आता गावात मंबाजीना कोणी विचारत नाही म्हणून शिष्य त्याला सांगतो की आता तुम्ही समाधी घ्यावी त्यानिमित्तान तरी शेवटचा म्हणून लोक तुमचं दर्शन घ्यायला येईल पण मग बाजी ना खूप राग येतो शिष्य पुढे संत तुकारामांचा अभंग सुद्धा गातो त्यावर मंबांची आणखी चिडचिड करतो. मंबाजीने रंभाला नटून थटून तुक्याला स्त्री वेडा म्हणून लोकांना दाखवण्यासाठी पाठवलेलं होतं. भटजी तेथे येतो आणि सांगतो की तुक्या रंभाचा तिच्या पाया पडतो आणि मला तू रखुमाई सारखीच म्हणून सांगतो तेव्हा रंबेला आपली चूक कळून

येते आणि ती मला मंबाजीने पाठवलेला होतं हे सुद्धा सांगते एवढेच नाही तर तू त्याचे शिष्य भडकले आहेत त्यांच्यावर. मंबाजी आणि भटजी मिळून एक तुक्याला गावाबाहेर काढण्यासाठी एक उपाय करता त्याने तुकारामाची तक्रार करण्याची ठरविले की तुकाराम धर्मद्रोही आहे.

इंद्रायणीच्या काठावर धर्मपिठाच्या सुनावणीसाठी लोकांची गर्दी जमली आहे. रामेश्वर शास्त्रीय होऊन दोन्ही बाजू श्रवण करून घेतो आणि असा निर्णय करतो की तुकाराम धर्मद्रोही आहे आणि त्याला शिक्षा म्हणून बोल्हभा आंबिले यांना उपदेश देण्यात येते की यापुढे त्यांनी कोणतेच अभंग म्हणू नये आणि देहू आळंदी परिसरातील कुणीही तुकारामांचे अभंग गाऊ नये तुकारामानं ब्राह्मण वर्गाची अपराध केला म्हणून आज पासून कुठल्या ब्राह्मणाने आपल्या पुत्राचे नाव तुकाराम ठेवावे नाही त्याचबरोबर तुकारामाची कोणतीच निशाणी इतिहास म्हणून राहू नये म्हणून तुकारामांचे लिखित स्वरूपात असलेले सर्व अभंग इंद्रयानीच्या पात्रात फेकून द्यावे. तेरा दिवस मांडी घालून सत्याग्रही अवस्थेत एका जागी अभंग इंद्रयानी तरेल म्हणून बसलेला आहे मंबाजी आणि भटची तुकारामाची मस्करी करत आहे आणि इतर लोकांना तुकारामांची दया येते आणि त्याला घरी जाऊन काहीतरी खायला सांगते पण तुकारामाला काही सुचत नाही तो कोणाचा ऐकत नाही एवढ्यात संताजी येतो आणि सांगतो त्या इंद्रायणीकडे बघू नका या इंद्रायणीकडे बघा जिथे गावातले लोक होते आणि प्रत्येक जण तुकारामाने लिहिलेला अभंगाचे ची तोंडात त्यांना पाठ होते त्या अभंगाचे गायन करतात आणि अशाप्रकारे तुकारामाने लिहिलेले अभंग इंद्रायणी तरते. हा सगळा प्रकार गावातले लोक मंबाची आणि भटजीना मारायला जातात पाहून मंबाजी त्यावेळी भटजी असा देखावा करतो की त्यांचा अहंकार आता खराच गळून गेला आहे आणि त्यांना तुकारामांचे शिष्य व्हायचे आहे तुकाराम दोघांना माफ करतो आणि हृदयाशी धरतो हे दृश्य पाहून लोकांनाही आनंद होतो.

भटजी आणि मंबाजी दोघे मिळून तुकारामांना ठार मारतात आणि तुकोबा सदैव साठी वैकुंठाला गेले म्हणून सांगतात गावातील लोकांना त्यांच्यावर विश्वास होतो. जिजाईना मात्र यावर विश्वास बसत नाही ती प्राण घेते की मी कधीच कुंकू पुसणार नाही.

## २.३.२ तुका झालासे कळस या नाटकाचा कथानक:

पहिल्या दृश्यात देहूतील विठ्ठल मंदिर दाखवलेला आहे त्याचबरोबर गजर संपवून संताजी आणि ग्यानबा भाविक भक्तांना निरोप देऊन नंतर संताजी आणि ग्यानबांचे संवाद चालू आहे गजारानंतर ते दोघे आपले काम करण्यासाठी निघते. तुकाररामांने मंदिर दुरुस्त करून तिथे कीर्तन करायला प्रारंभ केला आहे यावर बाजी रागावलेला आहे कारण मंदिर दुरुस्त केल्याने मंबाजींच्या मठात गर्दी कमी झाली आहे कारण लोक मंदिरात कीर्तन करण्यासाठी जात आहे मंबाजीचा मठ या लोकांमुळे चालत असल्याने मंभांची ला आता काळजी वाटू लागली च्या मठात स्त्रियांची जास्त गर्दी असतात मंबाजी सतत आपल्या शिष्याला घालून पाडून बोलत असतो मंबाजीचा शिष्य गावात अफवा पसरता की मंबाजी चमत्कार करतो आणि यासाठी मंबाजी गावात प्रसिद्ध होतो त्यामुळे लोक त्यांच्या मठात जात होते पण आता लोक तुकारामाबरोबर देवळात जातात आणि कीर्तने करतात तुकारामावर लोक आता विश्वास करू लागला हे मंबाजीना पाहून खूप राग यायचा आणि तुकारामावर कोणीच विश्वास न करावा म्हणून मंबाजी काही करून तुकारामांचा बायको मुलांना त्यांच्या मठात घेऊन जायला शोधतो तो एकदा त्यांच्या मठात गेले म्हणजे लोकांना वाटणार की तुकोबांची बायको आणि मुले तुकारामावर विश्वास करीत नाही. मंबाजी लोकांना अंधारात ठेवायचा प्रयत्न करतात आणि संत तुकारामांना त्यांच्या विरोध करण्याचा प्रयत्न करत आहेत आणि असे केले नाही तर मंबांची ला माहित आहे की त्याचा मठ बंद पडणार.

तुकारामांची पत्नी डोक्यावरून जळणाऱ्या लाकडांचा भारा घेऊन येते आणि संत तुकाराम चे बाहेर बसलेले आहे लोकांनी दुष्काळात त्यांच्याकडून उधार घेऊन गेले होते ते अजून परत केलेले नाही. तुकोबांना त्या वह्या आता इंद्रयानीच्या स्वाधीन करायचे आहे संत तुकारामाला आता कोणाकडून वसुली करायची नाही आहे. पण जिजाई त्याला समजावते की तुमच्या या बोळया स्वभावामुळे आमचा संसार चालणार नाही आम्ही रस्त्यावर येणार पण संत तुकारामांचा म्हणणं आहे की आधीच ते लोक बुडलेले आहेत ते आणि आम्हाला कसं कर्ज परत करू शकणार नाही.

संताजीने तेलाचा धंदा सुरू केला होता. सर्वात पहिल्यांदा तो तुकारामाच्या घरी तेल घेऊन आलेला आहे तुकाराम त्याला सांगतो की हे तेल आणि काही येताना काही घेऊन यायचं नाही पण संताजी ना ते मान्य नव्हते संताजी तुकारामाला आपला स्वतः देव मानत होते त्याला माहीत होते की आपली बायको आणि मुली संत तुकारामाने दुष्काळाच्या वेळी वेळेवर खाण्यासाठी पोटभर खाऊ दिलं म्हणून आजपर्यंत जगतात पण गावचे

लोक हे सर्व विसरून गेलेले आहे. जिजाई संताजी ना सुद्धा सांगते तुकारामांना समजवण्यासाठी की त्यांनी आपला धंदा जो आहे लोकांनी जे कर्ज नेले आहे ती वसुली केली पाहिजे म्हणून सांग म्हणून पण तुकाराम ऐकत नाही. तेवढ्यात तिथे ग्यानबा येतो आणि सोबत कळस काढलेल्या ज्वारी नाचणी घेऊन येतात ग्यानबा तुकाराम जि व जाई संताची यांचा संवाद चालू असताना तिथे मंबाजी 'जय बजरंग' ‘जय बजरंग' करीत प्रवेश करतात व तुकारामांना सांगतात की 'तुमची मुले आमच्याजवळ पोट भरून खाऊन गेलेले आहे'.तुकाराम म्हणतो की आमची मुलं तुमच्या मठात आली नव्हती तुम्ही आमच्या मुलाला घेऊन गेले होते त्यावर मंबाजी गोंधळतात. पण तरी असताना मंबाजी अहंकाराने सांगतो की तुमची मुलं आमच्याजवळ येऊन चांगलं चांगलं खाऊन गेले आहे. संत तुकाराम त्यांना सांगतो की आम्ही वैष्णवांचा धर्म जाणतो आम्ही वारकरी सदैव मठांचा आणि मठाधिपतींचा नावाखाली पुंजी गोळा करणारा बंधू धर्मांच्या अधिकार करत आलो आम्ही देवाच्या भक्तीचा बाजार नाही करत आणि धर्माच्या नावावर समाजात फूट घालत नाही हे सगळं आमच्या आदर्श विरुद्ध आहे यावर मंबांची आणि तुकाराम यांच्या मध्ये लढाई होतात त्यात संताजी आणि ग्यानबा सुद्धा मध्ये येतात हातातील धर्म दंड घेऊन मंबांची संत तुकारामांच्या अंगावर सुद्धा धावून येतो पण त्याला ग्यानबा आणि संताजी अडवतो नंतर मंबाजी तिथून जातो.

गेले चार दिवस शिवाजी संत तुकारामांचे सुश्राव्य कीर्तन ऐकत होतो तेव्हापासून शिवाजी ना सिंहासनाचे काटे टोचू लागले आहेत आणि त्याला तुकारामाचा शिष्य म्हणून यापुढे आता जगायचं आहे पण तुकोबा शिवाजी ना त्याचा मार्ग दाखवतो सोबत आणलेली शिवाजींनी अलंकार आणि कपडे सुद्धा तो जिजाईना स्वीकारू देत नाही यावर जिजाई रागवते.

संपत्तीचा मोह धरू नये हे समजावताना संत तुकाराम महाराजांनी खूप चांगला अभंग लिहिला आहे.

"मुंगी आणि राव आम्हा सारखाचि जीव।

सोने आणि माती आम्हा समान हे चित्ती॥

गेला मोह आणि आशा कळिकाळाचा फासा।

तुका म्हणें आलें घरां वैकुंठ सगळे। ।

**अंक दूसरा**

मंबाजी जेव्हा मठात प्रवेश करतात तेव्हा त्याला आवाज ऐकू येतात की "जगदोध्दारक, धर्मोपदेशक, धर्म मार्तंड, देहू मठाधीश्वर मंबाजी महाराज की जय.. " मंबाजी रागवल्या असलेला कारणाने तो ही घोषणा बंद करायला सांगतात. एवढ्यात सिद्धेश्वर तिथे प्रवेश करतात तेव्हा सिद्धेश्वराना कळून येतात की मंबाजीवर काय तरी संकट आलेल आहे मंबाजी त्याला सांगतात  तुकाराम महाराज लोकांना नको ते सांगून भटकावतो उदाहरणार्थ  "देवाची प्राप्ती करण्यासाठी भटा-ब्राह्मणांची गरज नाही, हे भट-ब्राह्मण म्हणजे देव आणि माणूस यामधले दलाल हाय दलाल.... " सिद्धेश्वर आणि रामचार्य हे सर्व ऐकून आश्चर्यचकित होतात  त्यांना माहित होते की लोकांना एकदा की सत्याचा मार्ग कळाला की  या डोंग्यांना गाव सोडून जायला पडणार म्हणून मंबाजी सिद्धेश्वर आणि रामचार्य मिळवून  यावर उपाय योजना करतात. एवढ्यात ग्यानबा आणि संताजी तिथे प्रवेश करतात. मंबाजी त्यांना बघून दूर राहण्यासाठी सांगतात कारण मंबाजीना त्यांची सावली सुद्धा स्वतःवर नको होती. संताजी आणि ग्यानबाला सत्याचे ज्ञान होते ते दोघी मिळवून मंबाजीना सांगतात की आमची सावली सुद्धा तुमच्यावर तुम्ही घेत नाही पण आमचे तेल फुकट नेतात त्याशिवाय आम्ही शूद्र असून सुद्धा तुमचे वाण आम्ही फुकट शिवतात. यावर संताची ग्यानबा मंबाजी सिद्धेश्वर रामचार्य यांच्यात भांडण सुरू होतात.

रात्रीची वेळ होती तुकारामाला झोप येत नव्हत संत तुकारामा अंगावर फोड आल्याने त्रास होत होता त्यांना ती सहन होत नव्हती एवढ्यात ओमकाराचा जयघोष चालू होतो बाबाजी स्वप्नात येऊन संत तुकारामाला जागा करतो आणि आणि संत तुकाराम महाराजांना सांगतात की तुझी वेदना कमी होणार तू जगाच्या वेदांचा शोध घे म्हणून सांगतात. संत तुकाराम महाराजांना कळून येते की त्यांचे गुरु बाबाची चैतन्य त्यांच्या स्वप्नात आलेले आहे. बाबाजी संत तुकारामांना समजावतो की अजून खऱ्या देवाचा अजून शोध लागला नाही आहे म्हणून तुला हा त्रास होतो बाबाजी चैतन्य तुकाराम महाराजांना 'राम कृष्ण हरी' हा मंत्र देतात आणि या मंत्राचा नामस्मरण करायला सांगतात आणि तिथेच त्यांना अक्षय सुखाचा ठेवा भेटेल असे सांगतात आणि बाबाजी चैतन्य जातात. उठल्यावर संत तुकाराम महाराजांना कळून येते की त्यांना गुरुची दीक्षा झालेली आहे.

संत तुकाराम भामनाथाच्या टेकडीवर जाऊन एकांतात देहभान विसरून भजन करतात. संताजी तिथे गायीने येतो आणि संत तुकारामाचे अभंग लिहून घेतात. जिजाजी संत तुकारामांना शोधात शोधा तिथे पोहोचते पण संताजी त्यांना हळू बोलायला सांगतात. जिजाई संतु ना सांगतात की माझा संसार बिघडलाच आहे तू तुझा

संसार सांभाळा संतु लांब जी जायचे दुःख कळते पण संतू काही ऐकून घेत नाही. मुलं बाळ घरी उपाशी असल्याकारणाने जिजाई संत तुकारामासाठी आणलेलं जेवण तिथेच ठेवतातआणि घरी परतते. संत तुकाराम महाराजांना विठ्ठल काही भेटत नाही म्हणून ते मोठमोठ्याने रडतात त्या वेळी काळोख होतो आणि अभंगाचा नाद घुमतो एक बाजूला प्रकाशमय होते आणि संत तुकाराम महाराजांना त्या किरणात पांडुरंगाच्या तेजमे मूर्तीचे दर्शन घडते. संत तुकाराम महाराज भानावर येतात आणि ते खूप आनंदात असतात कारण त्यांना देवाचे दर्शन झालेले असतात.

मंबाजी, रामेश्वर शास्त्रींना सांगतात की संत तुकाराम महाराज वैदिक धर्माविरुद्ध काम करतात संस्कृतातील वेदविद्या संत तुकाराम महाराज शूद्राना सांगतात. कवित्व करतो हे सांगून सुद्धा मंबाजी रामेश्वर शास्त्रींना सांगतात की संत तुकाराम महाराजांनी ब्राह्मणांना आपली दास बनवून ठेवलेले आहे सिद्धेश्वर शास्त्री मंबाजीबुवांना साथ देत सांगतात की शुद्रांना वेधार्थ सांगण्याचा हक्क नाही. तसेच रामचार्य सुद्धा त्यांना साथ देता आणि सांगतात की संस्कृत ही देवाची भाषा आहे. यावर संताची मंबाजी यांच्यामध्ये वाद होतो. रामेश्वर शास्त्री त्यांना गप्प करतात. रामेश्वर शास्त्री दोन्ही बाजू ऐकून घेता आणि शूद्रांचे काम शेतात श्रमाची कामे करणे त्यांना वेद वाचण्याचा अधिकार नसल्याने संत तुकारामाचे अभंग रचना म्हणजे महान अपराध ठरवतो आणि यापुढे संत तुकाराम महाराजांनी अभंग म्हणूनही नाही हा निर्णय घेतात आणि लिहिलेले अभंग इंद्रायणीत बुडवण्यासाठी सांगतात. संताजी घ्या ना मा रामेश्वर शास्त्रींना समजावण्याचा प्रयत्न करतात पण रामेश्वर शास्त्रीय धर्माला धरून निर्णय घेतलेला असता. मंबाजीना सिद्धेश्वरांना व रामचाऱ्यांना खूप आनंद होतो. संताची अभंग इंद्रयानी बुडविण्या होत नव्हते म्हणून संत तुकाराम महाराज स्वतः ते अभंग घेऊन बुडविण्यासाठी जातात.

**अंक तिसरा**

संत तुकाराम महाराज अभंग बुढवील्या कारणाने निराश होऊन गेले तेरा दिवसां पासून इंद्रायणी नदीकाठी श्री विठ्ठलंशी भांडायला म्हणजे देव कसा अंत बगत आहे ते पाहत आहे. जिजाई, संताजी तसेच इतर वारकरी संत तुकाराम महाराजांना समजावण्याचा प्रयत्न करत आहे की झाले ते सोडून जेवण्याचे दोन घास आणि पाणी पिऊन घ्यावे. पण संत तुकाराम महाराजांना मात्र श्री विठ्ठलांवर विश्वास होता की आपले अभंग परत इंद्रायणी नदीत तारणार. संत तुकाराम महाराजांच्या या व्यवस्थेसाठी संताची आणि जिजाई मंबाजीला कारण ठरवतात. संत तुकाराम महाराजांना मात्र देवावर राग आहे. देव त्याच्यासोबत नाही तर दुसऱ्यावर रागवून काय

फायदा याची जाणीव संत तुकाराम महाराजांना होती. एवढ्यात ग्यानबा इंद्रायणी तारलेले अभंग घेऊन अभंग तारले अभंग तारिले  करीत येतात संत तुकाराम महाराज ते अपंग डोक्याला लावून जिजाई देतात आणि श्री विठ्ठलाची माफी मागतात.जिजाईना खूप आनंद होतो. रामेश्वर शास्त्री प्रवेश करतात आणि संत तुकारामांजवळ माफी मागतात. पश्चातापाने रामेश्वर शास्त्री शेता मळ्यातून बागायती मधून घराघरातून फिरत होते तेव्हा त्यांना फिरता फिरता संत तुकारामाचे अभंग ऐकू येऊ लागतात तेव्हा ते अभंग लिहून घेतात असे इंद्रायणी तारलेले अबंग घेऊन ग्यानबा अभंग तारले अभंग तारिले  करीत येतात संत तुकाराम महाराज ते अपंग डोक्याला लावून जिजाई देतात आणि श्री विठ्ठलाची माफी मागतात.जिजाईना खूप आनंद होतो. रामेश्वर शास्त्री प्रवेश करतात आणि संत तुकारामांजवळ माफी मागतात. पण संत तुकाराम महाराजांना माफी समजावते. रामेश्वर शास्त्रींना आपली चूक कळून येते की त्यांनी अहंकार आणि संत तुकाराम यांच्या विरुद्ध निर्णय घेतलेला होता. रामेश्वर शास्त्रींनी स्वतः हे अभंग सर्वत्र फिरून लिहिले आहे हे पाहून संत तुकाराम महाराजांना वाईट वाटते कारण रामेश्वर शास्त्रींना हा त्रास घ्यावा लागला, पण रामेश्वर शास्त्रींना याचा आनंद आहे. मंबाजी, सिद्धेश्वर शास्त्री व रामनायकाचार्य तिथे प्रवेश करतात ते पश्चाताप झाल्याने ढोंग करतात आणि आपली मान खाली घालून थांबतात संत तुकाराम महाराजाशी माफी मागतात पण संत तुकाराम महाराज यांना त्यांच्यावर राग नसल्याचे सांगतात. संत तुकाराम महाराजांना वाटतं की खरच त्यांनी अहंकार सोडून दिलेला आहे आणि यासाठी संत तुकाराम महाराजांना समाधान वाटतो. तिघेही ढोंगी पणाने तुकाराम महाराज की जय पुंडलिक वरदे हरी विठ्ठल असा  घोष करतात.

तुकाराम महाराज तिथून दूर गेल्यानंतर मंबाजी, सिद्धेश्वर शास्त्री, आणि राम.चार्य तिघेही मिळून संत तुकाराम महाराजांना ठार मारण्याच ठरवतात. पण त्यांना शंका असते की संत तुकाराम महाराजांना ठार मारून सुद्धा ते लोकांच्या मनातून जाणार नाही तरीही पण ते संत तुकाराम महाराजांना मारायचं ठरवतात.

संत तुकाराम महाराज बसल्या जागी यापुढेही जाऊन देवाचा शोध घ्यायचा आहे. यासाठी संत तुकाराम महाराज जिजाई कडून अपेक्षा करतो की तिनी त्याला समजून घ्यावे.  संत तुकाराम महाराजांना आता एकांत कुठेतरी जाऊन फक्त देवाला शोधावे कसे वाटते. “आम्ही जातो आमच्या गावा। आमचा राम राम घ्यावा..” संत तुकाराम महाराज तिथून निघतात जिजाऊ त्यांना अडवण्याचा प्रयत्न करते.

संत तुकाराम महाराज उंच खडकावर बसलेले आहे. संतु आणि ग्यानबा तिथे प्रवेश करतात त्यांना संत तुकाराम महाराजांना एकटे सोडायचे नव्हते पण संत तुकाराम महाराज यांना सांगतात की तुम्ही इथून निघून जा त्यांना तिथून जायचे नसते पण ते जातात. तिथे काळोख होतो, थोडा थोडा ओळख काळोख वाढत जातो पुंडलिक वरदे हरी विठ्ठल असा घोष चालू असतो पुन्हा जेव्हा उजेड होतो तेव्हा संत तुकाराम महाराज तिथे नसतात मंबाजी सिद्धेश्वर आणि रामचार्य चमत्कार चमत्कार म्हणून तिथे प्रवेश करतात आणि सगळ्यांना सांगतात संत तुकाराम लक्ष्मीनारायणा सोबत वैकुंठाला गेले. "गरुड विमानी बसूनी। तुका झाले वैकुंठीवासी ॥"

संताजीना व ग्यानबाना हे पटत नाही. संताजी व ग्यानबाना संत तुकाराम महाराजाना शोधण्याचा प्रयत्न करतात. त्यांना महाराजांची गोधडी मिळतात,ग्यानबाला त्या गोधडीला डोक्याला लावून वंदन करतो. त्यांना दोघांना सुद्धा वाटते की संत तुकाराम खरच वैकुंठाला गेले असेल. प्रत्येक मराठी माणसाच्या मनात संत तुकाराम महाराज राहील.

**२.३.३ तुका आकाशा एवढा या नाटकाचा कथानक:**

नेहमीप्रमाणे आमराई राहुळात श्री विठ्ठलाच्या मंदिरात संत तुकाराम महाराज सोबत भजनात लोक रमलेले होते. भजन संपता संताजी संत तुकाराम महाराजांच्या अभंगांचे कौतुक करतात. तुकारामांची मुलगी काशी पण आईला चोरुन भजनासाठी येत होती संत तुकाराम सर्वांना राहुळात आमराईत कसे आणि केव्हा मंदिर झाले हे सांगतात. पूर्वज विश्वंभर म्हणून त्यांचे हरी भक्त होते. ते दरवर्षी वारी करायचे त्यांची आई जेव्हा मरणाला पोचली होती तेव्हा त्यांनी विश्वंभरांकडून वचन घेतलं होतं की आळंदी पंढरीच्या वारीत केव्हाही खंड पडू नये त्यांनी तसेच वारी चालू ठेवली. सुरुवातीला वारी आळंदीला असायची पण पंढरपूरची पांडुरंगाचे गुण ऐकून पंढरपूरची त्यांना ओढ लागली आणि विश्वंभर बुवा पंढरपुरात राहुळात असलेली मूर्ती पाहिली ज्या मूर्तीवर ज्ञानोबाला नामदेवाला एक नाथाला पाहता क्षणी शांत लागला होता त्या मूर्तीच्या चरणावर त्यांनी डोकं ठेवलं आणि त्यावेळी त्यांना असं वाटलं की त्याने असे म्हटले श्रीहरी सावळ्या आता अंतर देऊ नकोस आणि तेव्हापासून त्यांनी फक्त हरीचाच ध्यास धरला संसाराकडून त्यांचं लक्ष उडलं आणि अशा प्रकारे पांडुरंगाला दया आली भक्ती पुढे देवाचा नाईलाज झाला रात्री जेव्हा विश्वंभर बुवा झोपले होते तेव्हा स्वप्नात त्यांना आले की विश्वंभरा तुझे एक निष्ठा मरा मला कळली आता तुला पंढरीला यायचं काहीच कारण नाही मीच तुझ्या गावी येतो घराशेजारच्या आमराईत माझा शोध घे स्वप्नातील या दृष्टांतावर विश्वास ठेवून सकाळी विश्वंभर तुळशी दिंडी

वगैरे बरोबर घेऊन आमराईत गेले तर पाहता आंब्याखाली सारं काही अंथरलेलं होतं जागांवर करतात श्रीहरीची सगुण मूर्ती मूर्तीच्या गळयात तुळशीचा हार जसे की आत्ता कोणीतरी येऊन घातले आहे.

“ विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोहिला

वाटे हळूहळू चाला मुखाने पांडुरंग बोला” हा गजर गात गात त्यांनी मूर्ती घरी आणली तेव्हा त्याच्या आईने त्याला सांगल “रावळ बान घराशेजारच्या आमराईत” अशाप्रकारे श्री विठ्ठल रावळात बंदिस्त झाला तरी असताना विश्वंभर पंढरपूरची वारी करत होता त्यानंतर विठ्ठल पंत त्यानंतर पदाची त्यानंतर शंकर त्यानंतर कन्हैया आणि त्यानंतर संत तुकाराम महाराजांचे वडील म्हणजे बोललो का आणि त्याच प्रमाणे अशीच तिवारी संत तुकारामाने चालू ठेवली होती. संताजी ना सुद्धा भजनाकडे रस आहे ते सुद्धा आपल्या बायकोचा धुळा चुकून भजनाला येतात त्यांना सुद्धा एक प्रकारचा भजन करून समाधान वाटतं.

जेव्हा गावात दुष्काळ आला होता तेव्हा घर रोगाचे माहेर झालं होतं त्याचप्रमाणे संत तुकारामांची बायको सुद्धा चुकली नव्हती पोरांच्या खाण्यापिण्याची कशी व्यवस्था होणार याची चिंता होती आणि त्यातच त्यात वडिलांची संपत्ती सुद्धा सांभाळू शकला नाही संत तुकारामाच्या मते देवाची प्राप्ती भक्तीशिवाय नाही विश्वंभराना सुद्धा संसार सोडण्याची किंवा पाळी आली होती तेव्हा सुद्धा त्यांनी पांडुरंगाचे पाय सोडले नव्हते.

संत तुकारामांचे हे ऐकून संतांजीना आता संसाराकडे पाठ फिरायची असे वाटत होते पण संत तुकाराम महाराज संताजींचा सांगते की असंच करून चालणार नाही पण संसारात गुतून पडायचे सुद्धा नाही. वादळाची चाहूल लागते पण खरे म्हणजे त्यांची बायको आवली तिथे आली होती आणि येताच ती जमलेल्या भजनाला जमलेल्या लोकांना आणि आपल्या मुलीला काशीला शिव्या देतात परत भजनाला जमण्यासाठी आणि संत तुकारामा सोबत भांडते सुद्धा की तुम्ही माझ्यासाठी माझ्याबरोबर लग्न कशाला केला आणि या पोरांची जबाबदारी कोणी येणार आणि दिवस रात्र तुम्ही घरात बसून का नाही भजन करतात देवळात कशाला येतात घरात अन्न नाही पाणी नाही अशा अवस्थेत संत तुकारामात सोबत नसताना एकटी काय काय म्हणून करणार याची काळजी करून करून आवली आता कंटाळलेली आहे आणि तिला असं वाटतं की संत तुकाराम फक्त भजन करून संसाराकडे लक्ष देत नाही आणि श्री विठ्ठलाने त्यांना दरिद्री दिले आहे अवली संत तुकाराम

महाराजांसोबत भांडून भांडून संत तुकारामांना सांगते की मी वारीला पंढरपूर जायचे नाही आणि तुम्हालाही जाऊ देणार नाही आणि संत तुकारामांना ओढून ओढून घरी घेऊन जाते.

'विष्णू सूर्या वाघ' लिखित 'तुका अभंग अभंग' या नाटकात या नाटकात रामेश्वर शास्त्री दोन्ही बाजूने तक्रार ऐकतो आणि तुकोबांनी अभंग रचना करून मोठी चूक केलेली आहे म्हणून तुकोबांचे अभंग इंद्रयानीत बुडवण्याचे सांगतात.

'तुका झालासे कळस' हे नाटक 'श्री नरेंद्र मधुकर नाईक' द्वारा लिखित रामेश्वरांना कळून येते की त्यांनी अहंकाराने अंत होऊन तुकोबांचे अभंग इंद्रायणी बुडविण्यासाठी सांगतात, पण नंतर त्यांना कळून येते की संत तुकाराम हे ऋषीतुल्य महापुरुष आहे आणि ते तुकोबांची माफी मागतात.

'मुरारी उत्तम जिवाजी' लिखित 'तारिले अभंग इंद्रयाणीने' या नाटकात रामेश्वरने तुकोबांचे अभंग इंद्रायणीत बुडविण्याचा आदेश दिल्यानंतर त्यांच्या देहाला अचानक त्रास होऊ लागतात. आकाशवाणीत त्यांना कळून येते की हा त्रास त्यांना तुकोबांचे अभंग इंद्रयाने बुडविण्याचा आदेश दिल्यामुळे होत आहे आणि जोपर्यंत ते तुकोबांच्या पायावर पडून त्यांची माफी मागणार नाही तोपर्यंत त्यांचा त्रास कमी होणार नाही म्हणून ते तुकोबांची माफी मागायला जातात.

### ३.२.५ मंबाजी

मंबाजी हे एक ब्राह्मण होते. ज्याने सतत क्षत्रिय व इतर जातीच्या लोकांना कमी मानले स्वतःच्या स्वार्थासाठी मठ चालवले मंबाजी या पात्राने संत तुकाराम महाराजांना खूप त्रास दिला होता. मंबाजी संत तुकाराम महाराज त्याचप्रमाणे इतर लोकांचा द्वेष करत होते. निवडलेल्या पाचही नाटकात मंबाजी तुकारामांना खूप त्रास देतात त्याचप्रमाणे देहू गावातील लोकांसमोर तुकारामांना बदलाम करण्याचा प्रयत्न करतात. तुका अभंग अभंग या नाटकात मंबाजी तुकारामांना ठार मारतात.

'तुका आकाशा एवढा' या नाटकात तुकोबांचे अभंग इंद्रायणीत नदीत बुडवण्याचा तुकोबांचे अभंग इंद्रायणीत बुडवण्याचा रामेश्वरांचा आदेश मिळाल्यानंतर तुकोबा ते अभंग इंद्रयाने फेकून देतात पण त्यावेळी मंबाजी ना त्रास होऊ लागतात. शेवटी मंबाजी तुकारामांजवळ माफी मागतो आणि आपली चूक सुधारतो.

'तुका म्हणे आता' हे नाटकात शेवटी रामेश्वर शास्त्रीना सुद्धा आपली चूक कळून आल्यानंतर तुकोबांच्या विरोधात बोलायचं मंभाजी जवळ कारण नव्हते म्हणून त्यांना सुद्धा चांगलं होण्याची ढुंग करावं लागतं.

तुका अभंग अभंग या नाटकात तुकारामांचे अभंग इंद्रायणी नदीत बुडवून सुद्धा लोकांच्या तोंडावर तुकारामांचे अभंग होते तसेच लोक त्यांचा आदर करत होते हे पाहून मंबाजी आणि भटजी मिळून तुकोबांना ठार मारतात. त्याचप्रमाणे 'तुका झालासे कळस' या नाटकात तुकारामांचे अभंग इंद्रायणी नदीत तारते, तसेच लोक तुकोबांचा त्यांचा आदर करत होते हे पाहून मंबाजी आणि भटजी मिळून तुकोबांना ठार मारतात.

**३.२.६ काशी**

काशी हे पात्र निवडलेल्या नाटकातील दोन नाटकात दाखवलेले पात्र आहे ते म्हणजे 'तूका आकाशा एवढा' आणि 'तारिले अभंग इंद्रायणीने' काशी ही संत तुकाराम महाराजांची मुलगी. आपल्या बाबावर जसे विठुरायावर तिचा विश्वास होता आईला चोरून बाबासोबत ती भजनाला जात होती.

**३.२.७ कान्होबा**

कान्होबा आंबीले हे संत तुकाराम महाराजांचे धाकटे बंधू होते. संत तुकाराम महाराजांवर आलेल्या दुःख, संकटे, देवावर केलेल्या भक्ती बद्दल कानोबा साक्षीदार होते. कान्होबानी विठ्ठल भक्तीतून कविता लिहिल्या. कान्होबांचे अभंग स्वतंत्र होती कानोबांचे अभंग सुमारे १०० च्या आसपास असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यांच्या अभंगातून तुकारामावरील श्रद्धेचा प्रेमाचा प्रत्यय वारंवार येतो. त्यांनी आपल्या अभंगातून स्वतःला तुक्याचा दास म्हटले आहे. निवडलेला नाटकातील 'तुका आकाशा एवढा' या एकमेव नाटकात कान्होबांचे पात्र दाखवले आहे. चाहत कान्होबा जिजाईना संत तुकाराम शोधण्यासाठी मदत करतात तसेच जिजाईचा आणि तुकोबांचा आदार करताना दाखवलेला आहे.

## ३.२.८ पांडुरंग

पांडुरंगाना विठोबा, विठुराया, पंढरीनाथ, अशी नावे आहे. हिंदू धर्मात पांडुरंग हे विष्णू देवाचे रूप मानले आहे. पांडुरंगाला सावळा रंगाचा तरुण मुलाच्या रूपात कले केले जाते, ते कटीवर हात ठेवून विटेवर उभे राहतात. पांडुरंगाचे मुख्य मंदिर पंढरपूर आहे. आषाढ महिन्यातील राचनी एकादशी आणि कार्तिक महिन्यातील प्रबोधिनी एकादशीला विठोबाचे सर्वात महत्त्वाचे सण होतात. पांडुरंगाला वारकरी संप्रदायाचे प्रमुख दैवत मानले जातात. निवडलेल्या नाटकात पांडुरंग संत तुकारामांना भेट देण्यासाठी येतात.

निवडलेल्या पाच नाटकातील तीन नाटकात पांडुरंग हे पात्र दाखवलेले आहे, 'तुका आकाशा एवढा', 'तुका झालासे कळस' व 'तारिले अभंग इंद्रायणीने'.

## ३.२.९ संत नामदेव

संत नामदेव हे महाराष्ट्रातील संत कवी होते, जे संत ज्ञानेश्वरांच्या कालखंडात होऊन गेले. नामदेव श्री विठ्ठलाच्या सर्वात निकट असलेले संत होते निवडलेल्या नाटकातील दोन नाटकात नामदेव हे पात्र दाखवलेले आहे आणि ते नाटक म्हणजे 'तुका आकाशा एवढा' आणि ‘ तुका अभंग अभंग’. नामदेवांनी समाधी घेण्यापूर्वी श्रीविठ्ठलाना अभंग रचना करण्याचे वचन दिले होते पण काही कारणासाठी त्यांचे ते काम पूर्ण होऊ शकले नाही कालांतरात ते काम संत तुकाराम महाराजांनी पूर्ण केले.

## ३.२.१० शिवाजी महाराज

छत्रपती शिवाजी महाराज मराठा साम्राज्याची स्थापना करणारे श्रेष्ठ छत्रपती शिवाजी महाराज जानी संत तुकाराम महाराजांचा अभंग एकूण संत तुकाराम महाराजांना देव मानले होते त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांना संत तुकाराम महाराजांचे त्यांचे कर्तव्य आठवण दिले होते.

शिवाजी हे पात्र 'तारिले अभंग इंद्रयाणीने' या नाटकात दाखवलेले नाही. अन्य चारही निवडलेल्या नाटकात शिवाजी हे पात्र दाखवलेले आहेत.

**३.२.११ बाबाजी चैतन्य**:

बाबाजी चैतन्य हे संत तुकाराम महाराजांचे गुरू मानले जाते. त्यांचे मुळ नाव विक्ष्वनाथ आहे. त्यांचा जन्म पुणे येथे झाला होता. तुकाराम महाराजांना बाबाजी चैतन्य यांचे दर्शन प्रत्यक्ष घडले नव्हते तर बाबाजी चैतन्य त्यांच्या स्वप्नात दृष्टांत झाले होते. निवडलेल्या नाटकातील दोन नाटकात बाबांचे चैतन्य हे पात्र दाखवलेले आहे ते म्हणजे 'तुका अभंग अभंग' व 'तुका झालासे कळस'. त्याचप्रमाणे इतर तीन नाटकात सुद्धा बाबाजी चैतन्य यांचा उल्लेख झालेला आहे.

**३.३ गौण पात्र:मुख्य पात्रात आम्ही मुख्य पात्रांचा अभ्यास केला आता आम्ही दुय्यम म्हणजे गौण पत्रांचा अभ्यास करणार.**

**३.३.१ रामजी सावकार:**

रावजी हे देऊ गावाचे सावकार होते रामजी सावकार जेव्हा गावा बाहेर जातात तेव्हा आपलं शेत राखण्यासाठी ते तुकारामांना सांगतात. रामजी हे पात्र 'तारीले अभंग इंद्रयाणीने' या एकमेव नाटकात दाखवलेले आहे.

**३.३.२ भटजी :**

तुका अभंग अभंग या एकमेव नाटकात भटजीचा पात्र दाखवलेला आहे भटीची संत तुकारामांच्या घरी श्राद्ध होतं म्हणून भटजी त्यांच्या घरी आलेले असतात पहिल्या अंकावरून पहिल्या अंकाच्या पहिल्या प्रवेशावरून हे कळून येते की भटजींना मंत्र सारखी वाचायला येत नाही आणि भटजी लोकांना फसवून दक्षिणासाठी घरी घरी जाताना दिसतात. संत तुकाराम मुठीत घेऊन त्यांना सारखं मंत्र म्हणायला सांगतात म्हणून भटजी संत तुकारामांवर रागावून जातात. परत भटजींचे पात्र दाखवताना भटजी मग मंबाजी बुवा जवळ संत तुकारामांची तक्रार घेऊन गेलेले दाखवलेले आहे.

**३.३.३ शिष्य:**

शिष्य हे पात्र मंबाजीचे शिष्य म्हणून दाखवले आहे. तुका अभंग अभंग या नाटकात शिष्य हे पात्र दाखवलेले आहे. त्याचप्रमाणे 'तुका झालासे कळस' व 'तुका म्हणे आता' या दोन नाटकात शिष्य दाखवलेले आहे पण या दोन्ही नाटकात शिष्य या पात्रला रामनाय.चार्य असे नाव दिले आहे.

शिष्याला माहित असते की मंबाजी बुवा एक वाईट माणूस आहे असे असून सुद्धा शिष्य देऊ गावात मंबाजी बद्दल चांगली चर्चा करायचे जेणेकरून मंबाजी बुवांचे शिष्य वाढणार.

त्याचप्रमाणे ‘तारिले अभंग इंद्रयाणीने या नाटकात सालोमालो या नावात मंबाजीचा एक शिष्य दाखवला आहे.

**३.३.४ शिवबा**:

शिवबा हे एक संत तुकाराम महाराजांचे भक्त होते. भक्तीमुळे संसारातकडे त्यांचे ध्यान नसत.

**३.३.५ पार्वती:**

तुका अभंग अभंग या एकमेव नाटकात पार्वतीचे पात्र दाखवलेले आहेत पार्वतीचा पती शिवबा हे संत तुकाराम महाराजांच्या सोबत भजनाला जात होते आणि पार्वतीला याचा राग होता, म्हणून ती तुकारामांवर उखळलेलं पाणी टाकते.

**३.३.६ अंबाजी, म्हातारी, खंडोबा, गवरशेट, शिवबा, महादजी, गंगाराम, रहिमत, नावजी, मोकाशी**

तुका अभंग अभंग या नाटकात म्हातारी म्हणून एक पात्र दाखवलेले आहे. म्हातारी संत तुकाराम महाराजांची. त्याचप्रमाणे वरील पात्र हे नाटकात येणारे दुय्यम पात्र आहे. हे पात्र वारकरी होते. संत तुकाराम महाराजांसोबत ते भजन करायचे व विठ्ठल देवाची भक्ती करायचे.

**३.३. ७ पहिला , दुसरा , तिसरा , चौथा**

वरील पात्र तुका अभंग अभंग या नाटकातील पात्रे आहेत. गावातील पाटील जेव्हा संत तुकाराम महाराजांकडून महाजन की काढून घेतात तेव्हा हे पात्र तुकारामांची मस्करी करतात.

**३.३.८ पाटील**

गावात लोकांचा न्याय देणारा म्हणजे पाटील. पाटील संत तुकाराम महाराज शहा कडून म्हाजन पदवी काडून घेतात. 'तुका अभंग अभंग' या एकमेव नाटकात पाटील हे पात्र दाखवलेला आहे.

**३.३.९ ग्यानबा:**

निवडलेल्या दोन 'तुका म्हणे आता', व 'तुका झालासे कळस' नाटकात ग्यानबा हे पात्र संत तुकारामांचे एक शिष्य म्हणून दाखवलेले आहे. ग्यानबा संत तुकारामांना खूप आदर करीत होते. आणि त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालत होते. ग्यानबाला तुकाराम महाराजांचे अभंग ऐकायला खूप आवडत होते.

**३.३.१० देवी इंद्रयाणी**:

देवी इंद्रयाणी 'तारिले अभंग इंद्रयांनी' या नाटकात संत तुकाराम महाराजांचे अभंग शिवा रामेश्वर शास्त्री इंद्रायणीत बुडवण्यासाठी सांगतात तेव्हा अभंगाच्या वह्याना पाणी न लागू देता १४ दिवसांनी स्वतः येऊन परत करतात.

**३.३.११ जानकी :**

जानकी ही एक राजपुताणी होती. जानकी ही रामेश्वर शास्त्रींची बायको असून जानकी हे पात्र निवडलेल्या नाटकातील एकाच नाटकात दिसून येतात ते म्हणजे पु.ल.देशपांडे चे तुका म्हणे आता या नाटकात. चांदीचा असेल तर तुकाराम महाराजांवर विश्वास असतो श्रद्धा असते. त्याचप्रमाणे जानकीला संत तुकाराम महाराजांचे काही अभंग सुद्धा माहित आहे. जानकीने अभंग कांडण करणाऱ्या बायाकडून त्याचप्रमाणे रखमा म्हणून त्यांच्या घरी कांडण करण्यासाठी बाई येतात तिच्याकडून हे अभंग शिकून घेतली आहे. जानकी ही बाई धाडसी आहे ती पुरुषांना घाबरून आज जाणारी गप्प बसणारी बाई नाही आहे. जानकी एक शिकलेली बाई आहे.

**३.३.१२ धनाजी:**

'तारीले अभंग इंद्रयाणीने' या एकमेव नाटकात धनाजी एकत्र दाखवलेले आहे. धनाची मंबाजीचे शिष्य होते, पण संताजीच्या संगतीने तो चांगल्या मार्गावर येतात व तुकोबाचे शिष्य होतात.

**३.३.१३ पिऱ्या रामोशी:**

पिऱ्या रामोशी हे पात्र 'तुका म्हणे आता' या नाटकात दाखवलेले आहे. पिऱ्या रामोशी हे तुकोबांचे शिष्य होते.

**३.३.१४ सिद्धेश्वर शास्त्री:**

सिद्धेश्वर शास्त्री हे पात्र 'तुका म्हणे आता' व 'तुका झालासे कळस' या दोन नाटकात दाखवलेल्या आहेत. सिद्धेश्वर ब्राह्मण होते व ते स्वतःला खूप शहाणे समजत होते. मंबाजी सोबत राहून त्याने तुकोबांना खूप त्रास दिला होता.

**३.४ निष्कर्ष :**

१) तुकाराम, आवली, संताजी, मंबाजी व रामेश्वर शास्त्री हे पाचही नाटकातील मुख्य पात्र आहे.

२) निवडलेल्या नाटकातील ‘तारिले अभंग इंद्रयाणीने’ या नाटकाला सोडून शिवाजी हे पात्र राहिलेल्या चार नाटकात दाखवलेला आहे.

३) पांडुरंग हे पात्र ‘तुका आकाशा एवढा’, ‘तारिले अभंग इंद्रयाणीने’ व ‘तुका झालासे कळस’ तीन नाटकात दाखवलेला आहे.

४) काशी हे पात्र ‘तारिले अभंग इंद्रयाणीने’ व ‘तुका आकाशा एवढा’, या दोन नाटकात दाखवलेल्या आहे.

नामदेव हे पात्र सुद्धा ‘तुका आकाशा एवढा’ आणि ‘ तुका अभंग अभंग’ या दोन नाटकात दाखवलेले आहे.

५) ग्यानबा हे पात्र 'तुका म्हणे आता', व 'तुका झालासे कळस' या दोन नाटकात दाखवलेल्या आहे.

**३.५ समारोप**:

एकूण पत्रांचा अभ्यास करताना मला बाबाजी चैतन्य, संताजी या सारख्या पत्रांचा अभ्यास करायची संधी मिळाली. बघायला गेले तर एकूण पत्रांचा अभ्यास न म्हणतात थोडेफार आध्यात्मिक ज्ञान मिळाले.

संत तुकाराम महाराजांसोबत त्यांचे शिष्य संताजी तसे रामेश्वर शास्त्री यांनी अंधश्रद्धेचा पगडा दूर केलेला आहे. लोकांना नवा धर्म, नवा मार्ग दाखवलेला आहे. रामेश्वरशास्त्री सारख्या भटाने जाती-धर्माचा उतरंड म्हणून टाकला आहे. संताची सारख्या शिष्यासाठी आज आपल्याजवळ संत तुकाराम महाराजांचे अभंग लेखित स्वरूपात आहेत.

**संदर्भ सूची**

i. जोशी रामदास मधुकर, सिद्ध परंपरा आणि महाराष्ट्रातील संत, प्रकाशन, नागपूर,पृष्ठ क्रमांक १५१

## प्रकरण ४

## निवडलेल्या नाटकातील भाषिक अभ्यास

### ४.१ प्रस्तावना:

जसा साहित्यात साहित्यिक अभ्यास महत्त्वाचा ठरतो त्याचप्रमाणे कोणत्याही साहित्यकृतीचा अभ्यास करताना त्या साहित्यिककृतीतील भाषेचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. त्यातच त्यात जास्त महत्त्वाचा म्हणजे नाटकाचा भाषेचा अभ्यास करताना होतो जसे की आपण पहिल्या प्रकरणात नाटकाचे प्रकार बघितले त्यात पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, विनोदी, दलित नाटकाबद्दल माहिती जाणून घेतले त्याचप्रमाणे ज्या प्रकारचे नाटक आहेत त्याप्रमाणे लेखकाने भाषेचा विचार नाटकात करावा लागतो उदाहरणार्थ ऐतिहासिक नाटकात लेखक विनोदी भाषेचा वापर करू शकत नाही आणि यासाठी भाषेचा अभ्यास अत्यंत गरजेचा आहे

### ४. २ निवडलेल्या पुस्तकांचा भाषेचा अभ्यास

### ४.२.१ तुका म्हणे आता

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे लिखित तुका म्हणे आता या नाटकात बोलीचा वापर केलेला आहे. त्याचप्रमाणे काही वाक्य सहजपणे न समजण्यासारखे आहे उदाहरणार्थ

"भले त्यासी देऊ कमरेची लंगूटी नाठाळाचे काठी हाणू माथा!"

"तुका म्हणे तेथे अनिक न्हाई परी-म्हणूनोनी भिकारी झालो त्येंचा"

वरील वाक्य ग्यानबाने संतु आणि संत तुकाराम महाराजांची संवाद चालू असताना वापरले होते.

**काव्यात्मक संवादचा वापर:**

"फोटो हे मस्तक तुटो हे शरीर । नामाचा गजर सोडू नये।।, विठ्ठला विठ्ठला कंठ आळविता फुटला, कारे कृपाळू न होसी। काय झाले मजवीशी, झाल्या येर झरा। जन्म बहुतांचा फेरा, तुका म्हणे नाष्टा। अबोलण्या तुझ्या चेष्टा",

वरील अभंग संत तुकाराम महाराजांनी अभंग बुडविल्यानंतर विठ्ठलाची युद्ध करताना म्हटलेअभंग.

**नाटकात प्रतिमांचा केलेला वापर:**

काय चेटूकबिटूक केलंस

**नाटकात केलेल्या वाक्यप्रचारांचा उपयोग:**

दृष्टीआड व्हा

**नाटकात केलेल्या म्हणींचा वापर:**

"आंदळ्याशी जग आवगेची आंधळे"

**तुका म्हणे आता या नाटकात वापरलेले अपशब्द:**

"चांडाळा तोंडानं"

वरील अपशब्द संतुने मंबाजीना रागाने म्हटले आहे.

"पिऱ्या-तुझी कुराड हाण घालते त्या काळाच्या टाळक्यात."

वरील वाक्य जिजाई देवावर रागवून श्री  पांडुरंगाचा मूर्तीवर कुराड मारायला पाहते.

"त्या काळयाची-इट्टलाची श्यमा मागित व्हत्ये."

हे वाक्य जिजाईने श्री विठ्ठलाची माफी मागताना चांगल्या भावनेने उच्चारलेले आहे.

**४.२.२ तुका आकाशा एवढा**

तुका आकाशा एवढा या नाटकात सुटसुटीत भाषेचा वापर लेखकाने केलेला आहे. अगदी सोप्या साध्या भाषेचा लेखकाने नाटकात उपयोग केलेला आहे. बोलीचा वापर केल्यामुळे काही शब्द वाचताना थोडा गोंधळ होतो उदाहरणार्थ 'कवा' म्हणजे 'केव्हा'. पण यासारख्या शब्दात वाचनात काही खंड पडत नाही.

**नाटकात आलेल्या म्हणींचा उपयोग:**

"बाबांचे अभंग म्हणजे परसांतली भाजी वाटली तुला"

**नाटकात वापरलेल्या अपशब्दांचा वापर:**

संत तुकाराम सतत देवाच्या भक्ती तल्लीन असायचे. त्याचप्रमाणे देहू गावातले इतर लोक तसेच तुकारामांची मुलगी काशी राहुळात तुकोबासोबत अभंग म्हणताना जिजाई येऊन लोकांना तशी आपल्या मुलीवर प्रेमाने रागवून शिव्या देते.

'रांडेच्यानो'

'रांडे'

संत तुकाराम महाराजांना आषाढी वारीला जायचे असतात पण जिजाईला मुलांच्या जेवणाची चिंता सतवत होती. घरात धान्य नव्हते म्हणून जिजाई संत तुकाराम आषाढी वारीला गेलेले नको होते. त्यावेळी तुकोबांची ती भांडताना तुकोबा तिला सोबत वारीला बोलावतात तेव्हा आवली तुकोबांना म्हणते "मसणात जाईन पण तुमच्या या काळतोंड्या पांड्याच्या पंढरीला नाही जायची."

'मेल्याच्यानं'

आषाढी वारीला संत तुकाराम जाऊन आल्यावर जिजाई आणि तुकोबांचे भांडण होते, तेव्हा जिजाई रागाने श्री विठ्ठला ना वाईट शब्द बोलतात उदाहरणार्थ "कंसमामाला मारलं, जरासंध शिशुपालाला मारलं, कौरवांचा नाश केला. तो आहेच माणसं मारणारा, कसाई."

शिवाजी महाराजांनी दिलेले अलंकार आणि वस्त्रे जेव्हा जिजाई घालते तेव्हा संत तुकाराम जिजाईला ओळखत नाही तेव्हा जिजाई म्हणते" अरे माझ्या कर्मा-कर्मा.जळळ मेलं याचं लक्षण."

मंबाजीला आणि रामेश्वरांना जेव्हा आपली चूक समजतात तेव्हा ते तुकोबां जवळ माफी मागायला जातात पण जिजाई तुकारामांना सांगतात "मरू द्या हो यांना इथंच"

**४.२.३ तुका झालासे कळस**

तुका झालासे कळस या नाटकात लेखकांनी साध्या आणि सुंदर अश्या शब्दांचा वापर केलेला आहे. एखादा वाचक जेव्हा तुका झालासे कळस हे नाटक वाचायला सुरुवात करणार तेव्हा नाटक वाचून संपल्याशिवाय त्याला चैन पडणार नाही असे हे नाटक आहे. नाटकात बोलीचा वापर केलेला आहे उदाहरणार्थ

" व्हय, त्या माऊलीकडे पाहिले की जीव तुटतो बघा. तुकोबा आम्हास्नी पांडुरंग तर जिजावैनी रखुमाईच हाय बगा."

" आरं बामनानो, आत्ता आलात वय! आरं हत येताना लाज कशी नाय वाटली? "

**नाटकातकाव्यात्मकता काव्यात्मक आलेली भाषा:**

"बरे झाले देवा कुणबी केलो। ना तरी दंबेचि असतो मोकलीलो..॥"

खालील दिलेला काव्यात्मक संवाद संताजी आणि ग्यानबा मंबाजीला थट्टा मारण्यासाठी करतात.

संताजी:"भगवे तरी श्वान, सहज वेष त्याचा। तेथे अनुभवाचा काय पंथ? "

ग्यानबा: "ऐसे कैसे झाले भोंदू, कर्म करोनीं म्हणती साधू।

अंगी लावूनिया राख। डोळे झाकून करती पाप"

संताजी: दावूनी वैराग्याची कळा। भोगी विषयांचा सोहळा।

तुका म्हणे सांगू किती। जळो तयांची संगती"

**नाटकात केलेला प्रतिमांचा वापर:**

"इषारी नागाची जात आनी या बामनाची जात सारखीच"

" भक्तीचा मळा फुलला बघ."

नाटकात केलेल्या म्हणींचा उपयोग:

"बुद्धीस गहाण ठेवली"

**नाटकात अपशब्दांचे संवादात उपयोजन**:

"मराठी भाषा काय खेटरांची व्हय", 'ढोंगी', 'पाखंडी', "दासाला कोण भिक घालणार" मुर्खा'

वरील वाक्य शिष्या सोबत संवाद साधताना मंबाजीने केले आहे.

### ४.२.४ तारिले अभंग इंद्रयानीने

या नाटकात लेखक मुरारी उत्तम जीवाची यांनी ग्रामीण भाषेचा वापर केला आहे. संपूर्ण नाटकात साधी सोपी अशा भाषेचा उपयोग केलेला आहे. नाटकात बोली वापर केलेला आहे उदाहरणार्थ

" प्वाट भरू दे त्यांच सुखानं म्हणून जगू देत नाय तो काळतोंड्या"

**नाटकात वापरलेले अपशब्द:**

चीजाईने विठ्ठला साठी वापरलेलं 'काळतोंड'

### ४.२.५ तुका अभंग अभंग

तुका अभंग अभंग या नाटकात विद्रोही वृत्तीची समाजातील जातींच्या बंधनाविरुद्ध, समाज दर्शन आणि या सर्वांसाठी केलेल्या शिव्यांचा नाटकात समावेश त्याचप्रमाणे अपशब्दांचा वापर जास्त केलेला दिसून येतो. असे असताना सुद्धा नाटक आणि नाटकातील भाषा प्रभावी आहे. खरंच असे भाषेसोबत खेळणारा आणखी कोणी नाही तर विष्णू सूर्या वाघ हे आजपर्यंत एकच होऊन गेले. भाषा अगदी सामान्य माणसाला समजण्यासारखी आहे. अशिक्षित माणूस सुद्धा एकदा नाटक वाचायला लागला की नाटक सोपे पर्यंत त्या माणसाला चैन लागणार नाही. कारण विष्णू सूर्या वाघाने नाटकात भाषेची मांडणी करीत असताना एक सामान्य माणसाला आपला अवतीभवतीचा विषय असल्याचे जाणीव करून देतात.

नाटकात काव्यात्मक भाषेचा वापर:, "तुका म्हणे मज लागलीसे भूक... ","पौर्णिमेचा चंद्र चकोरा जीवन, तैसे माझे मन वाट आहे... "

"भुकेलिया बाळ अती शोक करी, वाट पाहे परि माऊलीची... "

वरील अभंगाची रचना तुकोबा अभंग इंद्रयाणीत बुडविल्यानंतर करतात. त्याला अभंग मिळवण्याची भूक लागलेली आहे, ते श्री विठ्ठलाची वाट पाहत आहात आहे की विठ्ठल त्यांचे अभंग परत घेऊन येणार.

**नाटकात वापरलेले अपशब्द:**

"खाल्ल्या पानावर हागनारी माणसं जास्त झालीत सध्या"

"आम्ही झवून पोरं काढतो", 'कुत्र्यांचे भुंकणे', तुकोबा जेव्हा शिवबाच्या घरी जेवायला जातात तेव्हा शिवबाची बायको तुकारामावर गरम पाणी फेकते तेव्हा शिवबा पार्वतीला 'रांडे' म्हणून शिवी देतो.

तुकोबा आणि इतर वारकरी जेव्हा शिवबाच्या घरी जेवायला जातात तेव्हा शिवबाची बायको तुकारामांना फाटक्यात तरटावर बसवतात व त्यांना शिव्या देतात

" तरटावर बसलं तर गांडीला काटे टोचतात का ह. ह्येंच्या? "

'रांडे' या शिवीचा नाटकात परत वापर केलेला आहे.

"तुका म्हणे मज लागलीसे भूक

धावूनी श्रीमुख धावे देवा! " संत तुकारामांचा हा काव्यात्मक संवाद ऐकून जिजाई 'हत्त मेल्या!' ही शिवी तुकारामाना प्रेमाने देते.

संत तुकाराम देवाच्या दर्शनासाठी तर असलेले आहे पण श्री विठ्ठल काही त्यांना दर्शन देत नाही म्हणून तुकारांम श्री विठ्ठलाला शिव्या देतात.

"... लटिकेचि सोंग मांडिला पसारा, , "... अरे गाढवा", "निलाजरा", "चोरटा"", "बैल तू देवा"

रामेश्वर शास्त्री जेव्हा तुकारामा विरुद्ध निर्णय घ्यायला येणार होते तेव्हा बराच वेळ इंद्रायणी काठावर कोणीच आले नव्हते तेव्हा नावजी व इतर वारकरी त्यांची वाट बघत होते, तेव्हा नावजी प्रेमाने इतर वारकऱ्यांना "बराच येळ जाला की रं गड्यानो!" म्हणतात.

**निष्कर्ष**

नाटकात वापरलेली गेलेल्या भाषा बोली त्याचप्रमाणे संवाद वाक्यप्रचार म्हणी सांकेतिक अशक्त उपमा या सर्वामुळे नाटक त्याचबरोबर नाटकात वापरलेले अभंग काव्यात्मता वातावरण निर्मिती करती पाचही नाटकाची स्वतंत्र अशी शैली आहे. नाटकात भाषा साधी सोपी वापरलेली आहे.

नाटकात खटकेबाज, चुरचुरीत, विनोदी अशा भाषेचा वापर केला आहे.

**समारोप**

सर्वात महत्त्वाचे म्हणजे निवडलेल्या नाटकांचा भाषेचा अभ्यास करताना लेखकाने संत तुकारामांचे काही देवासाठी अपशब्द असलेले अभंग घेतलेले आहे. या अभंगावरून कळून येतात की संत तुकारामांना देवाबद्दल काही वाईट भावनेने तुकारामांने देवाला वाईट शब्द दिलेले नाही तर त्यांना देवाशी दुरावा सहन होत नसल्याकारणाने त्यांनी अशा शब्दांचा वापर केलेला आहे.

# प्रकरण ५

# संत तुकारामावर आधारित पाच नाटकांचे तुलनात्मक अध्ययन

## ५.१ प्रस्तावना

संता जणू देवारूपच आहे. आमचे आजचे जीवन ताण-तणावाचे झाले आहे हे पूर्ण जग दू:खाने भरलेलं आहे. या कलियुगात लोक देवापुढे जाऊन माझे चांगले करा यापेक्षा दुसऱ्यांचे वाईट करा म्हणून प्रार्थना करतात दिसतात. अशावेळी आमच्या संतांची वाणी अभंग कीर्तने खरं सोनं आहे. परमेश्वराचे नाव ओठावर ठेवून स्वतःचे काम चालू ठेवणे याशिवाय दुसरे सुख काय आहे. संतांनी स्वतः अनेक संकटांना तोंड दाखवलेले आहे तरी आपल्यावर अन्याय करणाऱ्या माणसासाठी एक सुद्धा वाईट शब्द काढला नाही आम्ही तर साधी माणसे आहोत. संतांनी दाखवलेल्या मार्गावर चालणे हाच आमचा धर्म असला पाहिजे. आनंद, समाधान, मनाचे मोठेपणा आणि शिस्त ज्या आमच्या संताकडे भरभरून होत्या भरभरून त्यांनी लोकांना वाटल्या आणि आमच्यासाठी सुद्धा अभंग, ग्रंथलिहून ठेवल्या हो संत तुकारामांनी फक्त देवभक्ती बरोबर जाऊन समाजसुधारणावर भाष्य केलेले आहे.

आमच्या संतांनी पूर्वजांनी आम्हाला स्त्रीचा करायला शिकवले आहे. आमच्या पुढे मोठा कोणीही असो तरी सत्याच्या वाटेने जाण्याचा मार्ग आम्हाला संताने दाखवलेला आहे. जन्माबरोबर संसाराच्या कटकटी या येतातच पण त्याला कसे तोंड दाखवावे ती जबाबदारी कशी उचलवावी हे आमच्यावर अवलंबून असतात. सत्याचा विजय शेवटी असतोच. माणसाची जुनी सवय आहे. माणूस क्षणभराच्या सुखासाठी पूर्ण आयुष्य घालवतात खरे सुख अनुभवायचे आसेत तर आम्ही संतानी दाखवलेल्या मार्गावर चालणे आवश्यक आहे.

## ५.२ संत तुकारामावर आधारित पाच नाटकांचे तुलनात्मक अध्ययन

तुका अभंग अभंग या नाटकात सुरुवातीचा प्रसंग पूर्वी देहू गावात महाजनकी बोल्होबाच्या मोरे-आंबिले घरान्याकडं होती त्याचप्रमाणे संत संत तुकारामांच्या घराण्याला मान प्रतिष्ठा होती. दुष्काळामुळे संत तुकाराम महाराज स्वतः कर्जदार होऊन लोकांना दिलेली कर्जे त्यांनी परत घेतलेली नव्हती म्हणून गावचे पाटील संत

तुकाराम महाराजांकडून म्हाजन काढून घेतात. या प्रकरणानंतर संत तुकाराम महाराज देहू गावातल्या भामनाथ डोंगरावर जाऊन डोळे मिटून बसतात.

‘तुका अभंग अभंग’ या नाटकात संत तुकाराम महाराज बाबाजी चेतन यांचा आशीर्वाद घेऊन श्री विठ्ठलाला शोधण्यासाठी भांबनाथाच्या डोंगरावर जाऊन देहभाग विसरून बसतात आणि भजन करतात. संत तुकाराम महाराजांना कुठेच देव मिळत नाही म्हणून शेवटी महाराज कंटाळतात आणि श्री विठ्ठलाला शिव्या देऊ लागतात एवढ्यात  नाचणारा  विठ्ठल संत तुकाराम महाराजांना भेटतात.

‘तारिले अभंग इंद्रायणीने’  या नाटकात संत तुकाराम महाराज भामनाथ डोंगराच्या भागावर देवाचा शोधासाठी एकांत जाऊन बसले होते.

पाचही नाटकातसंत तुकाराम महाराज हिशोबाच्या वह्या इंद्रायणीत फेकून देतात.

तुका म्हणे आता या नाटकात संत तुकारामाच्या महाराजांच्या घरात देहू गावातले इतर लोक भजनासाठी येऊन बसतात आणि संत तुकाराम महाराजांसोबत ते भजनात मग्न होऊन गेलेले असतात. संत तुकारामाच्या भक्तीचा मार्ग अगदी सोपा आहे देवाला नाम स्मरण करणेकरणे, अगदी साध्यातला साधा माणूस सुद्धा संत तुकारामांच्या घरी येऊन बसून भजन करू शकत होता. उदाहरणार्थ  तेली संतु , ग्यानबा चांभार. इतर चारही नाटकात देहू गावातील लोक भजनासाठी देहूच्या विठ्ठल मंदिरात जातात, त्याचप्रमाणे वारकरी वाड्यावर फिरून भजन करत होते.

‘तुका अभंग अभंग’ या नाटकात  एक प्रसंग दाखवलेला आहे त्यात संताजी संत तुकाराम मनसे अभंग लिहून घेतात पण लिहिताना जोडाक्षरी शब्द आला की संतू अडतो पण संत तुकाराम महाराज संतुला जोडाक्षरी शब्द शिकवतात.

'तुका म्हणे आता'  व 'तुका अभंग अभंग' या नाटकात संताजी जेव्हा तेलाचा धंदा सुरू केल्यानंतर पहिला द्रोण संत तुकाराम महाराजांना घेऊन येतात.

'तुका झालासे कळस’ या नाटकात  संताची संत तुकारांमाना भेटायला येतात आणि येताना सोबत तेल घेऊन येतात, त्याचप्रमाणे ग्यानबा दुसरा वारकरी संत तुकारामांना भेटायला येतो तेव्हा सोबत नाचण्याची पिशवी घेऊन येतात.

पाचही नाटकात संताजीची तुकाराम  महाराजांना देव मानतात.

‘तारिले अभंग इंद्रायणीने’  या नाटकात संत तुकाराम महाराजांनी दुष्काळाच्या वेळी देहू गावातल्या गरीब लोकांना शेतकऱ्यांना दिलेले कर्ज माफ केलेला प्रसंग दाखवलेला आहे.

'तुका झालासे कळस’ या नाटकात पहिल्या प्रवेशात वारकऱ्यांना संत तुकाराम महाराज देव असल्यासारखी वाटतात कारण त्याला संत तुकाराम महाराजांनी जगण्याची एक नवीन दिशा दाखवली आहे.

पाचही नाटकात संत तुकाराम महाराज लोकांना सांगतात की देवाच्या भक्तीसाठी जपाची  किंवा यात्रेची गरज नसते देव सगळीकडे आहे तेव्हा देवाचे मनातून फक्त नामस्मरण केलं तर पुरे, भक्त संकटात असतात तेव्हा देव भक्ताला सतत मदत करतात.

पाचही नाटकात जिजाई तुकाराम महाराजांवर रागावतात पण तिचा संत तुकाराम महाराजांवर तसाच प्रेमही असतो आणि ती आपल्या नवऱ्याला आणि मुलांना सांभाळते तसेच ती वरच्यावर  वारकरी मंडळींना काहीही म्हटलं तरीही तिच्या मनात देवाबद्दल श्रद्धा आहे.

'तुका आकाशा एवढा' या नाटकात परिस्थितीमुळे जिजाई मुलासोबत उपाशी झोपले असताना संत तुकाराम महाराज विचार करतात की या सर्वांना जबाबदार कोण, पण संत तुकाराम महाराजांना कुटुंबाचा विचार करण्यापेक्षा देवाची भक्ती करणे हाच त्याचा मार्ग दिसत होता. संत तुकाराम महाराज संसार सोडून भामनाथाच्या डोंगरावर एका डगरावर बसून देवाचं नामस्मरण करतात.

‘तुका आकाशा एवढा’  या नाटकात  संत तुकाराम महाराज संसारावर लक्ष देत नाही म्हणून जिजाई चिडलेली असतात आणि यावर जिजाई आणि संत तुकाराम महाराज  भांडताना सुद्धा दाखवलेले आहे.

'तुका आकाशा एवढा' या नाटकात संत तुकाराम महाराज पंढरीच्या वारीत खंड पडू देत नव्हते आणि यंदा जिजाईना संत तुकाराम महाराजांना वारीला पाठवायचे नसतात म्हणून ती महाराजांना शिव्या देतात, त्याचप्रमाणे महाराज वारीला जाऊ नये म्हणून रात्री झोपताना महाराजांच्या पायाला धोर बांधला होता. पण संत तुकाराम महाराज न झोपता जिजाई झोपल्यानंतर वारीला जातात.

त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रवेश सुद्धा पाचही नाटकात दाखवलेला आहे. शिवाजींचा संत तुकाराम महाराजांबद्दल आदर त्यांच्या भजनाबद्दल अभंगाबद्दल प्रेम त्याचप्रमाणे शिवाजी महाराज 'तुका

म्हणे आता' या नाटकात तुकारामांच्या पायाशी बसायला गेलेला दाखवलेला आहे. शिवाजीने आणलेले वस्त्र दागिने संत तुकाराम महाराज स्वीकारत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांना महाराजांचे अभंग ऐकून असं वाटलं होतं की राज्यकारभार सोडून संतांची संतांनी दाखवलेला मार्ग निवडावा. संत तुकाराम महाराजाजवळ जेव्हा शिवाजी भक्तात की साधे तेली सुद्धा अभंग करतात आणि संत तुकाराम महाराज ज्याप्रमाणे शिवाजी महाराजांना समजावतो तेव्हा महाराजांना पटतं, महाराजांना आपली चूक कळून येते.

'तुका अभंग अभंग' या नाटकात संत तुकाराम महाराजांच्या भेटीसाठी छत्रपती शिवाजी महाराज आलेले आहे. शिवाजी महाराज तुकाराम महाराजाजवळ दीक्षा दाखवायला सांगतो, शिवाजी महाराजांना आपले शिपाई गुलामगिरी करतात त्याचप्रमाणे युद्धात लोक मरतात हे महाराजांना सहन होत नाही म्हणून ते शांततेचा मार्ग स्वीकारण्यासाठी तयार होते पण तेव्हा संत तुकाराम महाराज त्याला समजावून सांगतात की तुम्ही टाळ हातात घेण्यासाठी नाही तर लोकांचा जीव वाचवण्यासाठी तुझा जन्म झाला आहे आणि रोहिडेश्वराला साक्षी ठेवून हिंदवी स्वराज स्थापना करण्याची शपथ चार वर्षांपूर्वी घेतलेली आहे. हे सगळे सांगू शिवाजी महाराज महाराजांना समजावून परत पाठवतात.

'तारिले अभंग इंद्रायणीने' या नाटकात शिवाजी महाराज संत तुकाराम महाराजांचे भजन ऐकायला येतो हे सांगितलेला आहे.

पाचही नाटकात शिवाजी महाराज संत तुकाराम महाराजांना भेटायला येतात तेव्हा वस्त्रे अलंकार व सुवर्णमुद्रे भरलेली ताटे भेट मला सोबत घेऊन येतात.

'तुका झालासे कळस' या नाटकात छत्रपती शिवाजींची भेट संत तुकाराम महाराजांना दाखवलेले आहे. महाराजांना युद्ध करायचे नाही आहे तो संत तुकाराम सोबत इच्छितो पण संत तुकाराम महाराजांना सांगतात की तुमचा शास्त्र रक्षण हाच खरा धर्म रणांगण गाजवणे हे तुझे काम.

'तुका आकाशा एवढा' या नाटकात शिवाजी महाराजांची संत तुकाराम महाराजांना भेट दाखवलेले आहे.

'तारिले अभंग इंद्रायणीने' या नाटकात पंढरीचा पांडुरंग व संत नामदेवाच्या कीर्तनाच्या तालावर नसलेला प्रसंग दाखवलेला आहे

'तुका झालासे कळस' या नाटकात संत एकनाथ संत तुकाराम महाराजांच्या स्वप्नात येऊन त्यांनी 'एक कोटी अभंग रचना केरीन' असा शब्द संत एकनाथनी पंढरीच्या विठुरायाला दिलेला होता तो संत तुकाराम महाराजांना पूर्ण करण्यास सांगितलेला प्रसंग दाखवलेला आहे.

तुका म्हणे आता' या नाटकात मंबाजी संत तुकारामांच्या मुलांना घेऊन आपल्या मठात जेवायला नेलं होतं कारण त्याला लोकांना दाखवायचा होता की संत तुकाराम एक ढोंगी आहे आणि त्याची मुलं उपाशी आहे म्हणून तो जेवायला आपल्या मुलांना माझ्या मना त पाठवतात म्हणून मंबाजी बुवाने संत तुकाराम महाराजांना फास घालून मारायचा प्रयत्न केलेला दाखवलेला आहे.

'तुका अभंग अभंग' या नाटकात संत तुकाराम महाराजांच्या घरी श्राद्ध असते तेव्हा गावातले भटजी त्यांच्या घरी येतात आणि काही कारणासाठी संत तुकाराम महाराज भटजीशी भांडतात. संत तुकाराम महाराज या भांडणात झडप घालून भटजींचा चालू व मुठीत पकडतो त्याला गुरांना बांधल्यासारखे करता आणि अपशब्द सुद्धा वापरतात की "आता गेला नाहीस तर पाट घालीन डोक्यात! "

जेव्हा संत तुकाराम महाराज कवित्व करून लोकांना जगण्याचा खरा मार्ग दाखवू लागतात तेव्हा मंबाजी घाबरतात की आता ते लोकांना फसवून त्यांच्याकडून पैसे, सामन घेऊ शकणार नाही म्हणून त्याला गावात स्वतःचे मंदिर बांधायचे आहे म्हणजे लोक त्याला देव समजणार.

'तारिले अभंग इंद्रायणीने' या नाटकात संत तुकाराम गावात कीर्तन केल्याने लोकांना जगण्याचा मार्ग दाखवल्या कारणाने मग माझी चिडतो. मंबाजी तुकारामांसोबत भांडण करायला जातो आणि भांडणात मंबाजी हातातील सोटा संत तुकाराम महाराजांच्या पाठीत मारतो. त्यावेळी संत तुकाराम महाराज रुद्र अवतार घेतात.

'तुका झालासे कळस' या नाटकात मंबाजीना भीती होती की संत तुकाराम महाराज जरी याप्रमाणे लोकांना मार्गदर्शन करून त्याला खरा मार्ग दाखवला तर लोक सुधारतील आणि त्याच्या मठात जाणार नाही आणि यासाठी मंबाची एक युक्ती काढतात ज्यात संत तुकाराम महाराजांचे नाव घाण होणार आणि लोकांना असे वाटणार की संत तुकाराम महाराज हे एक ढोंगी आहे. तो संत तुकाराम महाराजांच्या मुलांना घेऊन आपल्या मठात जेवणासाठी जातात आणि ठरवतात की लोकांना सांगायचे म्हणजे लोक महाराजांना ढोंगी समजणार.

'तुका झालासे कळस' या नाटकात मंबाजी संत तुकाराम महाराजांच्या मुलांना जेवणासाठी आपल्या मठात घेऊन गेला होता म्हणून मंबाजी आणि संत तुकारामांचे भांडण होते.

'तुका झालासे कळस' या नाटकात मंबाजीचा मठात जास्त करून स्त्रिया, रात्री अपरात्री सुद्धा स्त्रिया त्यांच्या मठात जातात.

'तुका आकाशा एवढा' या नाटकात सत्य तुकाराम महाराज शूद्र असून कवित्व करतो म्हणून मंबाजी रागवून रामेश्वर शास्त्री जवळ तक्रार करतात. तेव्हा रामेश्वर शास्त्री सद तुकारामांना सांगतात की त्यांचे अभंग म्हणजे पाप आहे तेव्हा त्यांनी रचलेले अभंग बुडवून प्राचीन केले पाहिजे.

'तुका म्हणे आता' या नाटकात आषाढीच्या वारीला संत तुकाराम महाराजांनी इतर वारकरी पंढरपूरला वारीसाठी जातात हे संवादातून दाखवलेला आहे.

'तुका म्हणे आता' या नाटकात जानकी संत तुकारामाची मोठी भक्त त्याचप्रमाणे रामेश्वर सुद्धा संत तुकाराम असे मोठे भक्त होते पण संभाजीच्या सांगण्यावरून व ग्रंथाच्या आधारावरून रामेश्वर शास्त्री संत तुकाराम चे अभंग इंद्रायणीत बुडवण्याचा निर्णय घेतात.

संताची जानकी आणि रामेश्वर शास्त्री तिघे मिळून गावागावात फिरून शेतात फिरून लोकांना बाई दिसलेल्या अभंग लिहून घेऊन सगळे अपंग एकत्र करतात आणि संत तुकाराम महाराजांना देतात.

संत तुकाराम महाराजांना जानकीच्या रूपात साक्षात इंद्रयानी दिसते.

'तुका अभंग अभंग' या नाटकात तुकोबा जिजाई शांत झोपले असताना एकदा विठ्ठल विठ्ठल असा नाम घोष होतो आणि नामदेव नाचत प्रवेश करतात सोबत विठ्ठल असतात. संत तुकाराम महाराज झोपेतून उठून बसतात. संत नामदेव सांगतात संत ज्ञानेश्वर बरोबर जेव्हा भक्तीचा जागर मांडला होता तेव्हा "तुझी सेवा म्हणून एक कोटी अभंग लिहीन" हे काम संत नामदेव पूर्ण करू शकले नव्हते म्हणून ते संत तुकाराम महाराजांना पूर्ण करण्यासाठी सांगतात आणि संत तुकारामांना कवित्वाचा अधिकार देतात.

'तुका अभंग अभंग' या नाटकात संत तुकाराम महाराज बाबाजी चेतन यांचा आशीर्वाद घेऊन श्री विठ्ठलाला शोधण्यासाठी भांबनाथाच्या डोंगरावर जाऊन देहभाग विसरून बसतात आणि भजन करतात. संत

तुकाराम महाराजांना कुठेच देव मिळत नाही म्हणून शेवटी महाराज कंटाळतात आणि श्री विठ्ठलाला शिव्या देऊ लागतात एवढ्यात नाचणारा विठ्ठल संत तुकाराम महाराजांना भेटतात.

'तुका अभंग अभंग' या नाटकात एकदा भजन संपवून संत तुकाराम महाराज आणि इतर वारकरी शिवबाच्या घरी जेवण्यासाठी जातात तेव्हा शिवबाची पत्नी पार्वती संत तुकाराम घरी आल्यावर त्याला बसायला फाटक तरट देते, दोरीत ओलेल्या वाहाणांचा हार संत तुकाराम महाराजांच्या गळ्यात जेव्हा संत तुकाराम महाराज जेवण्यासाठी बसतात तेव्हा पार्वती गरम उघडलेलं पाणी महाराजांच्या अंगावर घालतात तेव्हा संत तुकाराम महाराज आता बाबाजी चैतन्य येऊन  समजावतात की तू एक साधारण माणूस नाही आहे तुला हे सहन करावे लागणार आणि महाराजांना राम कृष्ण हरी हा जप  करायला सुरुवात कर म्हणून सांगून जातात.

'तुका अभंग अभंग' या नाटकात संत तुकारामांचे गावात नाव घाण करण्यासाठी भटजी व मंबजी घेऊन रंभाला संत तुकारामांना जवळ जवळ पाठवली होती. पण संत तुकाराम महाराज रंबेच्या रूपावर मोहित न होता तिला आई म्हणतो आणि रंभाला सुद्धा आपली चूक कळून येते किती आपला देहाचा वाईट उपयोग करत होती.

'तारिले अभंग इंद्रायणीने'  या नाटकात मंबाजी आणि सालोमालो संत तुकारामांचे नाव गावात स्त्री वेडा म्हणून बदलाम करण्यासाठी चिमणाबाईंना तुकाराम जवळ तिच्या नादी लावण्यासाठी पाठवतात. उलट संत तुकाराम महाराज चिमणाबाईंना सुधारतात ती नाचून आपले पोट भरत होती ती कीर्तन करायला सुरुवात करते.

'तुका आकाशा एवढा' या नाटकात गावात सर्व लोक संत तुकाराम महाराजांचा जप करायला लागले होते म्हणून मंबाजीला भीती वाटायला लागली होती की जरी संत तुकाराम महाराजांनी देऊ च्या लोकांना जगण्याचा खरा मार्ग दाखवला तर त्याचा मठ एक दिवस बंद पडणार. मुंबईची लोकांना संत तुकारामचे साथ सोडायला सांगतात.

'तारिले अभंग इंद्रायणीने'  या नाटकात धनाजी ब्रह्मचारी हनुमानाचे भक्त असून याशिवाय ब्रह्मचारी व स्वीकारलं तरी पण बाई विषयी मोह याचं वर्णन केलेलं दिसतं पण संत तुकाराम महाराज मात्र परकी स्त्रीकडे संत तुकाराम महाराजांना ईश्वराशिवाय काहीच दिसत नाही.

'तुका आकाशा एवढा' या नाटकात इंद्रयाणीत अभंग बुडवून संत तुकाराम महाराज बारा दिवस काही न खाता पिता इंद्रयाणी जवळ बसलेले असतात तेव्हा तेराव्या दिवशी पांडुरंग बाळकृष्णाचा रूपघेऊन घेऊन सोबत

हातात संत तुकाराम महाराजांचे अभंग घेऊन प्रकट होतात. तेव्हा रामेश्वर शास्त्री आणि मंबाजी संत तुकाराम जवळ माफी मागतात.

संत तुकाराम महाराजांच्या पूर्वजाना ईश्वरांचा स्वप्नात पांडुरंगाने दर्शन दिले होते तो प्रसंग दाखवलेला आहे.

‘तारिले अभंग इंद्रायणीने’ या नाटकात रामजी एक महिन्यासाठी संत तुकाराम आला शेताची राखण करायला सांगतात, संत तुकाराम हे काम स्वीकारतो पण शेतात जाऊन तो देवाची भक्ती करतो आणि पक्षी सारे पीक खातो. पण शेवटी मळणी केल्यानंतर पीक दुप्पट मिळतात.

'तुका आकाशा एवढा' या नाटकात संत तुकाराम महाराज पांडुरंगाची श्रद्धेने भक्ती करतात ते पाहून पांडुरंग आणि संत नामदेव महाराजांना भेटायला येतात आणि संत तुकाराम महाराजांना कवित्व करण्यासाठी सांगतात.

'तुका आकाशा एवढा' या नाटकात संत तुकाराम महाराजांना विठ्ठलाची विरह सहज होत नाही तेव्हा विठ्ठल त्याला परत एकदा भेटतात.

'तुका आकाशा एवढा' या नाटकात संत तुकाराम महाराजांना वैकुंठाला देण्यासाठी देव स्वतः गरुड विमा घेऊन खाली येतात संत तुकाराम महाराज आपल्या पत्नीला तसेच संताजी ना सुद्धा आपल्या सोबत येण्यासाठी सांगतात पण ते दोघी जात नाही कारण ते सजारात अडकलेले होते.

भटजी व मंबाजी गावात धर्मसंसद करायचा ठरवतो. म्हणजे वेदोनारायड रामेश्वर शास्त्री येऊन संत तुकाराम महाराजांना शिक्षा देणार. रामेश्वर शास्त्री निर्णय घेतात की संत तुकाराम महाराज नीचे अभंग लिहिले आहे ते इंद्रायणीत फेकून घ्यावे. इंद्रायणीच्या काठावर उभे राहून संत तुकाराम महाराज पाण्यात अभंग बुडवितो पण इतर वारकरी तिथे येऊन एक एक संत तुकाराम महाराजांचा अभंग म्हणतात अभंग इंद्रायणी तारिल्यासारखे वाटते. मंबाजी व भटजी महाराजा जवळ माफी मागतात आणि सुधारल्यासारखे झाल्यासारखे दाखवतात आणि नंतर संत तुकाराम महाराजांचे मोठे भक्त झाल्यासारखे दाखवतात आणि त्याला एकांत घेऊन जातात आणि ठार मारतात आणि गावात येऊन सांगतात की संत तुकाराम महाराज सदैव वैकुंठाला गेले आहे गावातले जो विश्वास करतात पण जिजाइना मात्र त्यांच्यावर विश्वास बसत नाही.

संत तुकाराम आणि निसर्गाबद्दल वर्णन केलेले आहे की निसर्ग आम्हाला किती महत्त्वाचा आहे.

संत तुकाराम महाराजांनी दुष्काळाच्या वेळी देहू गावातल्या गरीब लोकांना शेतकऱ्यांना दिलेले कर्ज माफ केलेला प्रसंग दाखवलेला आहे.

काशी सतत बाबाच्या बाजूने बोलत होती जरी आईने संत तुकाराम महाराजांना काहीही म्हटले तर ती गप्प बसायची नाही. तिला आपल्या बाबा बद्दल बरं वाटायचा.

रामेश्वर शास्त्री संत तुकाराम महाराजांना बोलावतो आणि संत तुकाराम महाराजांना धर्मशास्त्राच्या नियमानुसार त्यांची अपंग गाथा इंद्रायणी पुरवण्यास सांगतात.

नाटकात इंद्रायणी नदी दाखवली आहे, पांडुरंग आणि संत तुकाराम चे अभंग परत करण्यासाठी इंद्रायणी देवीला सांगितले होते.

'तुका आकाशा एवढा' या नाटकात संत तुकाराम महाराजांनी वृक्ष सुद्धा आमचे सोयरे म्हणून सांगितलेला प्रसंग दाखवलेला आहे.

**५.३ निष्कर्ष**

'तुका आकाशा एवढा' या नाटकात संत तुकाराम महाराज संताजी काशी आणि अन्य वारकरीना आमराईत राऊळात श्री विठ्ठलाची मूर्ती कशी उभी झाली ते सांगतात. निवडलेल्या नाटकातील 'तुका आकाशा एवढा' हे नाटक वेगळे ठरतात कारण तू का आकाशाएवढा या नाटकात विठ्ठलाची तीन वेळेला संत तुकारामांना भेट दाखवलेले आहे तसेच एका वेळेला संत तुकारामांना विठ्ठलाचा दुरावा सहन होत नाही म्हणजे नामदेवाला जसा विठ्ठलाचा दुरावा सहन होत नव्हता त्या प्रकारे संत तुकाराम महाराज विठ्ठलाचा दुरावा सहन होत नाही असे तुका आकाशा एवढा या नाटकात दर्शविलेले आहे त्याचप्रमाणे तुका आकाशाएवढा या एकमेव नाटकात संत तुकाराम महाराजाला वैकुंठाला नेण्यासाठी देवाने विमान पाठवले होते, असे नाटकात दाखवलेले आहे.

'तुका म्हणे आता' निवडलेल्या नाटकापैकी वेगळे नाटक ठरते कारण 'तुका म्हणे आता' या नाटकात संत तुकाराम महाराज इतर नाटकांच्या तुलनेत खूप शांत स्वभावाचे दाखवलेले आहे. इतर नाटकात संत तुकाराम महाराज मंबाजी सारख्या वाईट माणसाजवळ भांडायला जातात पण 'तुका म्हणे आता' या नाटकात तुकाराम महाराजांनी या वाईट माणसाजवळ भांडण केलेलं नाही आहे उलट मंबाजी वाईट मार्गावर आहे आणि तो सुद्धा

त्यांच्यातच एक आहे याची जाणीव महाराजांना आहे. तुकोंबा 'तुका म्हणे आता' या नाटकात विठ्ठलाला शिव्या देतात पण वाईट मनाने नाही तर त्यांना देवाचा दुरावा सहन होत नव्हता म्हणून शिव्यांचा वापर करून देवाला आपल्या जवळ बोलावण्याचा प्रयत्न करत आहे.

त्याचप्रमाणे 'तुका म्हणे आता' या नाटकात आणखी एक वेगळेपण दाखवलेले आहे ते म्हणजे रामेश्वर शास्त्री तुकारामांना अभंग बुडविण्याचा आदेश देण्यापूर्वी तुकारामांचे भक्त होते, एवढेच नाही तर अभंग बुडविण्याचा आदेश दिल्यामुळे पश्चातापाने स्वतः देहू गावात फिरून लोकांना माहित असलेले अभंग स्वतः लिहून लिहून घेतलेले आहे आणि नाटकाच्या शेवटला रामेश्वर शास्त्री नाम संत तुकारामांचे शिष्य म्हणून जगायचं आहे.

‘तुका अभंग अभंग’ हे नाटक इतर नाटकापेक्षा वेगळे आहे कारण तुका अभंग अभंग या नाटकात लेखकाने संत तुकाराम महाराजांचे एक वेगळे अंग दाखवून दिले आहे. तुका अभंगा अभंग या नाटकात तुकाराम महाराज विद्रोही स्वभावाचे दिसून येतात. विद्रोही स्वभावाचे असून सुद्धा संत तुकाराम महाराजांनी चुकीचा मार्ग समाजाला दाखवला नाही. उलट तुकोबांनी समाजाला चांगल्या मार्गावर नेण्याचा सदैव प्रयत्न केलेला आहे. एवढे असून सुद्धा तुकोबांनी वाईट वागणाऱ्या माणसांमध्ये सुद्धा कधीच फरक केला नाही.

‘तुका झालासे कळस’ हे नाटक निवडलेल्या नाटकापैकी वेगळे ठरतात कारण चुका झाल्याचे कळस या नाटकाद्वारे लेखक संत तुकाराम महाराजांनी भागवत धर्मावर कशाप्रकारे कळस चढवला हे स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे ‘तुका झालासे कळस’ या नाटकाद्वारे लेखक पांडुरंगाच्या भक्ताने देवाकडून काय काय करून घेतलं हे स्पष्ट केलेलं आहे. पुंडलिकाने २८ युगे वर उभे केले. एकनाथाने कावडी वाहून घेतल्या, जनाबाईंनी लुगडी धुऊन घेतली, सखूनं सासूच्या तोंडी दिलं, मिराबाईनं विष प्यायला लावलं, नामदेव कीर्तन करायचा आणि श्री विठ्ठल भान सोडून नाचत होते.

तारिले अभंग इंद्रयाणीने या नाटकात वेगळेपण असे आहे की या नाटकात लहानपणी आपण ऐकल्याप्रमाणे इंद्रायणी देवी स्वतः संत तुकारामांचे बुडलेले अभंगांना पाण्याचा एक थेंब सुद्धा न लावता परत देते.

**५.४ समारोप**:

पाचही नाटकात समान प्रसंग दाखवलेले आहे ते म्हणजे शिवाजी महाराजांची संत तुकाराम महाराजांना भेट.

संतु तेले जो संत तुकारामांना देव मानतो आणि दुष्काळानंतर तेलाचा धंदा सुरू करतो तेव्हा तेलाचा पहिला द्रोण संतु संत तुकारामाला देतो आणि संतुला याची सुद्धा जाणीव असते की दुष्काळाच्या वेळी संत तुकाराम महाराजांनी शेतकऱ्यांना तसेच गावातल्या लोकांना कर्ज दिले होते आणि ते तुकारामांने परत घेतले नाही.

संत तुकाराम महाराजांचे संसारावर लक्ष नसते म्हणून जिजाईचे तुकारामांसोबत भांडण.

रामेश्वर शास्त्रीन संत तुकाराम महाराज शास्त्राविरुद्ध जाऊन अभंग रचना करतो म्हणून त्यांचे अभंग इंद्रायणीत नदीत बुढविण्याचा आदेश करतात.

मंबाजीने संत तुकारामाला खूप त्रास केलेला होता, कारण त्याला माहित होती एकदा की लोकांना सत्याची जाणीव झाली की लोक त्याच्या मठात येणे कमी करणार आणि मठ बंद झाले तर त्याला पैसे आणि कडधान्य लोकांकडून मुक्त नाही मिळणार.

**समारोप:**

नाटक हा इतर साहित्य प्रकारापेक्षा वेगळा साहित्यप्रकार आहे. नाटक हा दृकश्राव्य असा प्रकार आहे. भरत मुनिना भारतीय नाट्य कलेचे जनक मानले जाते.

१७ व्या शतकातील वारकरी संतात संत तुकारामाने आपल्या साहित्यातून आपल्या अभंगातून आपल्या कीर्तनातून लोकांना मार्गदर्शन करण्याचे त्याचप्रमाणे सामान्य लोकांना ईश्वर भक्तीचा मार्ग दाखवलेला आहे.

गोमंतकीय आणि महाराष्ट्र अशा दोन वेगळ्या प्रदेशातल्या पाच वेगळ्या लेखकांनी संत तुकारामाच्या चरित्रावर भिन्न प्रकाराने नाटक लिहिले आहे.

**निष्कर्ष:**

१) संत तुकारामांची व्यक्तिरेखा नाटकामध्ये कशा पद्धतीने मांडली आहे, याचा शोध घेतला  आहे.

२) वारकरी संप्रदायाचा काळ आणि आजचा काळ याबद्दल लेखक काय सांगण्याचा प्रयत्न करत आहे, ते समजून गेलेले आहेत.

३) आजच्या पिढीसाठी संत तुकारामांचे अभंग कसे मार्गदर्शक ठरत आहेत याचे विवेचन करणे आवश्यक आहे.

४) संत तुकारामाने कशाप्रकारे सामान्य लोकांना भक्ती मार्ग दाखवला याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

५) पाचही नाटकात संत तुकाराम रचित अभंग आहे.

६) पाचही नाटकात संत तुकाराम हे व्यक्तीप्रमाणे दर्शविलेला आहे

जय जय रामकृष्ण हरी | जय जय रामकृष्ण हरी ||

जय जय विठ्ठल | जय हरी विठ्ठल |

# संत तुकामांवर आधारित पाच लेखकांच्या पाच नाट्यसंहिता





प्रसाद तुकाराम सावंत



पु. ल. देशपांडे



विष्णू सूर्या वाघ



श्री नरेंद्र मधुकर नाईक



मुरारी उत्तम जिवाजी















**श्री नरेंद्र नाईक यांची घेतलेली मुलाकत**

नमस्कार मी अश्विनी आनंद गावकर गोवा विद्यापीठ शणें गोयबाब भाषा आणि मराठी साहित्य मराठी अध्ययन शाखेतून बोलत आहे.

नमस्कार.

सर यावर्षी सेमिस्टर फोर साठी आम्ही डिजिटेशन करीत आहे. माझ्या प्रकल्पाचा विषय 'संत तुकारामाच्या जीवनावर आधारित पाच नाटकांचा विवेचनात्मक अभ्यास' असा आहे.

सर माझ्या विषयाला धरून मला तुमच्याजवळ काही बोलायचं होतं तुमच्याजवळ थोडा वेळ असेल तर मी बोलू शकते का?

हो नक्की

जसं की मी तुम्हाला सांगितलं मी पाच पुस्तकांची निवड केली आहे आणि त्या पुस्तकांचे नाव

१) तुका आकाशा एवढा,

२) पु. ल. देशपांडे लिखित तुका म्हणे आता

३) विष्णू सूर्या वाघ लिखित तुका अभंग अभंग

४) मुरारी उत्तम जिवाजी लिखित तारिले अभंग इंद्रयानीने

त्याचप्रमाणे तुम्ही लिहिलेले नाटक 'तुका झालासे कळस' झालेले पुस्तक मी निवडलेले आहे.

सर पुस्तकातून तुम्ही समजल्याप्रमाणे संत तुकाराम महाराजा बद्दल काही माहिती तुम्ही देऊ शकतात का?

हमे म.ए भाग एकला असताना आम्हाला संत साहित्याचा अभ्यास म्हणून एक विषय होता, त्यामध्ये संत तुकाराम हा एक विषय होता त्यावेळेला थोडेफार संत तुकारामाबद्दल वाचले होते. त्यानंतर तुका अभंग अभंग हे विष्णु सूर्या वाघ यांचे नाटक आले ते नाटक वाचल्यानंतर तुकोबांचे आमच्या समोर एकूण चरित्राचे दुसरे अंग दिसून आले पूर्वी तुकारामांचे अभंग तेवढे आम्ही ऐकत होतो. तुका अभंग अभंग हे नाटक वाचून तुकारामाबद्दल एक वेगळी ओळख झाली म. ए ला असताना मी अनेक अभंग शिकलो ते उपदेशावर

समाजातील जातीभेदावर वाईट वृत्ती प्रवृत्तीवर परंपरा यावर असुर ओढणारे त्यांचे अनेक अभंग आहेत. संत तुकाराम म्हणजे एक समाज सुधारक वाईटावर असून ओढणारे विद्रोही प्रकारचे संत तुकाराम आम्हाला साहित्यातून समाजातून दिसून आले नाही तर लहानपणी मी संत म्हणजे एक शांत आणि भजन करणारा असा समजत होता. अभंग करणे म्हणजे फक्त संताचे काम नाही तर समाजाला उपदेश करणे, समाजाला मार्ग दाखवणारा वाईटातून चांगल्या मार्गाला समाजाला नेणारा असे संत तुकाराम मला समजून आले.

तुम्हाला नाटकासाठी सुचलेल्या शीर्षका बद्दल काही सांगू शकाल?

नाटकाच्या शेवटला मी बहिणाबाईंचा अभंग घातला आहे त्या अभंगाद्वारे कळून येते की ज्ञानदेवांनी भागवत धर्माची सुरुवात केली आहे. ते पुढे नेण्याचे काम संत नामदेवांनी केले आहे आणि कळस चढविण्याचे काम खरोखरच संत तुकारामाने केले आहे एवढी त्यांची विपुल कविता रचना आहे. वृक्षवल्ली आम्हा सोयरे या अभंगाद्वारे तुकाराम आम्हाला पर्यावरणाची शिकवण देतात. त्याचप्रमाणे त्यांच्या अनेक अभंगातून आम्हाला काही ना काही शिकवण मिळते. या प्रकारे मी 'तुका झालासे कळस' हे नाटकाला शीर्षक दिले.

तुमच्याशी बोलून मला माझ्या बऱ्याच प्रश्नांची उत्तरे मिळाली आणि खरंच तुम्ही खूप चांगल्या प्रकारे उत्तरे दिली आणि यासाठी मी खरोखर तुमचे मनापासून आभार मानते.

**संदर्भ ग्रंथ:**

जोशी रामदास मधुकर, सिद्ध परंपरा आणि महाराष्ट्रातील संत, प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्रमांक १५२०

“पिंगे डॉ. श्रीनिवास, माळी प्रि. गजभल, तुकारामांचे निवडक १०० अंभग, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रास्ताविक

“ जोशी रामदास मधुकर, सिद्ध परंपरा आणि महाराष्ट्रातील संत, प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्रमांक १५१

“ जोशी रामदास मधुकर, सिद्ध परंपरा आणि महाराष्ट्रातील संत, प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्रमांक १५०

**संभाव्य आधारग्रंथ:**

१) वाघ विष्णू सूर्या- 'तुका अभंग अभंग, पार्थ प्रकाशन, गोवा, २०००.

२) नाईक नरेंद्र मधुकर 'तुका झालीसे कळस, सनी प्रकाशन, पालये, गोवा, २००९.

३)सावंत प्रसाद तुकाराम 'तुका आकाशा एवढा', आनंदी तुकाराम स्मृती प्रकाशन, गोवा, २००१.

४) जिवाजी मुरारी उत्तम 'तारिले अभंग इंद्रायणीने, गोवा, २०१३.

५) देशपांडे पुरुषोत्तम लक्ष्मण 'तुका म्हणे आता', सदाशिव, प्रकाशन, पुणे.१९७९.